
नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १२७ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com



डॉ. सौ. स्वप्नाली अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon)
Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ : सकाळी १० ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रूट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरडयांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबडयांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026


दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net

मंगळवार, दि. ०७ एप्रिल २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार?

### विलीनीकरणाच्या चर्चेवर शरद पवारांनी अखेर मौन सोडलं

पुणे : (स. गांवकरी)

पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकांच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेसचे विलीनीकरण होणार असल्याच्या चर्चा जोरात सुरू झाल्या होत्या. मात्र, अजित पवार यांच्या निधनानंतर या चर्चा थांबल्या. दोन्ही पक्षांकडून विलीनीकरणाबाबत संदिग्ध प्रतिक्रिया येऊ लागल्या. त्यामुळे विलीनीकरणाची चर्चा झाली होती की नाही यावर अद्याप खुलासा आलेला नाही. दरम्यान, यावर आता खुद्द शरद पवारांनीच मौन सोडलं आहे. आज त्यांनी पत्रकार परिषद घेऊन माध्यमांशी विविध मुद्द्यांवर चर्चा केली.

"राजकारणात लोकांचं काम करण्यासाठी यावं लागतं. अजित पवार हे लोकांचं काम करण्यासाठी सक्रिय होते. अजित पवारांबद्दल नागरिकांमध्ये आदर होता. दुर्दैवाने त्यांचं अपघाती निधन झालं. कुटुंब म्हणून आम्हाला त्याचं दुःख आहे. पवार कुटुंबावर संकट आलेलं आहे. मी कुटुंबप्रमुख आहे. त्यामुळे कुटुंबप्रमुख म्हणून माझ्यावर जबाबदारी आहे", असं शरद पवार म्हणाले.

विलीनीकरणाबाबत शरद पवार म्हणाले, "विलीनीकरणाबाबत जयंत पाटील आणि अजित पवार चर्चा करत होते. परंतु, अजित पवारांच्या मृत्यूनंतर ही चर्चा थांबली. आमच्या पक्षात आता याविषयी चर्चा नाही. विलीनीकरणासंदर्भात अजित पवारांबरोबर जयंत पाटलांच्या पाच-सहा बैठका झाल्या होत्या. बैठक झाल्यानंतर दोघांपैकी एक येऊन मला ब्रिफिंग करत होते." ते पुढे म्हणाले, "भविष्यात ही प्रक्रिया पुढे जाऊ शकते की नाही हे आज सांगता येणार नाही. अजित पवारांचा दृष्टीकोन आम्हाला समाधान देणारा होता. परंतु, ते गेल्यामुळे कंटिन्यू राहिलं नाही."

सुनेत्रा पवार यांना तुम्ही पाठिंबा दिला आहे. पण आता त्यांचा प्रचार तुम्ही आणि सुप्रिया सुळे करणार का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. यावर बोलताना शरद पवार म्हणाले की, "आम्ही त्यांच्या विरोधात उमेदवार उभा केलेला नाही."



#### खरात प्रकरणावर टिप्पणी

राज्यात गाजत असलेल्या अशोक खरात प्रकरणावर बोलताना, शरद पवार म्हणाले, "आज राज्यात चिंता वाटावी अशी परिस्थिती आहे. एका बाजूला शाहू, फुले, आंबेडकर म्हणायचं आणि दुसरीकडे अशा पद्धतीने लोकप्रतिनिधी जातात हे चिंताजनक आहेत. कोणी किती फोन केले हे माझ्या वाचनात आलं, त्यात अनेकांची नावं आहेत. त्यात राजकीय पक्षात स्थान भुषवणारे लोक आहेत."

#### उमेदवार देण्याचा काँग्रेसला अधिकार

"काँग्रेस एक राजकीय पक्ष आहे, त्यामुळे निर्णय घेण्याचा त्यांना अधिकार आहे. त्यामुळे त्याबाबत जास्त चर्चा करण्याची गरज नाही. तसेच बारामती पोटनिवडणूक बिनविरोध होऊद्या अशी मागणी करण्याचंही काही कारण नाही. लोकशाहीमध्ये निवडणूक लढवायची असेल तर समोर कोणीतरी उमेदवार असेल हे मान्य करूनच निवडणूक लढवावी लागत असते", असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

## सीईटीच्या वेळापत्रकात बदल

### राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमुळे बदलल्या तारखा

मुंबई : (स. गांवकरी)

अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी महत्त्वाच्या असलेल्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित (पीसीएम) गटाच्या सीईटीच्या वेळापत्रकात बदल करण्याचा निर्णय राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाने घेतला आहे. रोजी राष्ट्रीय स्तरावरील तीन महत्त्वाच्या परीक्षा १२ एप्रिल आयोजित केल्या आहेत. त्यामुळे त्या दिवशी सीईटी ठेवण्यात येऊ नये, अशी मागणी अनेक विद्यार्थी व पालक यांनी केली होती.

या मागणीचा विचार करून सीईटी कक्षाने ११ ते २० एप्रिल या दरम्यान होणाऱ्या प्रवेश परीक्षांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. दरम्यान, एकाच विद्यार्थ्याला तीन-तीन वेळा तात्पुरते प्रवेशपत्र आल्याने विद्यार्थ्यांचा गोंधळ उडाला आहे. सीईटी कक्षाने यंदा पीसीएम गटाची सीईटी ११ ते २० एप्रिलदरम्यान आयोजित केली आहे. मात्र १२ एप्रिल रोजी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीसह (एनडीए), सीडीएस आणि नाटा या राष्ट्रीय स्तरावरील तीन प्रवेश परीक्षा आयोजित केल्या आहेत. त्यापैकी एनडीएची परीक्षा बारावी उत्तीर्ण विद्यार्थीही देत असल्याने आणि त्याच दिवशी सीईटी होणार असल्याने विद्यार्थ्यांची अडचण होत होती. त्यामुळे सीईटी परीक्षेच्या वेळापत्रकातून १२ एप्रिलचा दिवस वगळण्याची मागणी विद्यार्थ्यांसह पालकांनी केली होती. या मागणीची दखल घेत सीईटी कक्षाने १२ एप्रिल रोजी होणारी पीसीएम गटाची परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे.




या परीक्षेसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे तात्पुरते प्रमाणपत्र आणि सिटी इंटिमेशन स्लिप ५ एप्रिलपासूनच मिळण्यास सुरुवात झाली आहे. वेगळ्या शहरात किंवा तालुक्यात परीक्षा असेल तर विद्यार्थ्यांना प्रवासाचे नियोजन सोपे व्हावे, यासाठी सीईटी कक्षाने यंदा विद्यार्थ्यांना आगाऊ सूचना देण्यास सुरुवात केली आहे. मात्र मुंबईतील काही विद्यार्थ्यांना एकदा-दोनदा नाही, तर तीन तीन वेळा वेगवेगळी तात्पुरती प्रमाणपत्रे मिळाल्याची तक्रार आहे. दरम्यान, केंद्रांच्या संख्येनुसार आणि उपलब्धतेनुसार विद्यार्थ्यांचा समावेश कोणत्या दिवशी आणि कोणत्या केंद्रावर करणार, याबाबतच्या सूचना दिल्या जातात. विद्यार्थ्यांना ७ एप्रिलपासून अंतिम प्रवेशपत्र प्राप्त होणार असून त्यावर असलेले परीक्षा केंद्र, पत्ता आणि तारीख निश्चित मानावी, असे आवाहन सीईटी कक्षाने केले आहे.

## थोडक्यात...

### २४ तिकीट तपासनीस 'करोडपती'!

मुंबई (स. गांवकरी) : विनातिकीट प्रवाशांची डोकेदुखी वाढली आहे. विनातिकीट प्रवाशांची टक्केवारी वाढत असताना, त्यांना रोखण्यासाठी तिकीट तपासनीस पथक तैनात केले आहे. मध्य रेल्वेतील २४ तिकीट तपासनीसांनी विनातिकीट प्रवाशांना पकडून करोडो रुपयांची दंडवसुली केली आहे. त्यात मध्य रेल्वे मुख्यालयातील १०, भुसावळ विभागातील १०, मुंबई विभागातील ३ आणि पुणे विभागातील एका तिकीट तपासनीसाने एक कोटीपेक्षा जास्त रुपयांचा दंड वसूल करून, मध्य रेल्वेला वाया जाणारा महसूल प्राप्त करून दिला आहे. मध्य रेल्वेने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ३८.०५ लाख विनातिकीट प्रवाशांना पकडून, २०३.७० कोटी रुपयांची दंडवसुली केली. तर, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ४१.८२ लाख विनातिकीट प्रवाशांना पकडून, २५१.४२ कोटी रुपयांची दंडवसुली केली. त्यामुळे या दोन्ही वर्षांच्या तुलनेत मध्य रेल्वेवरील ९.९४ टक्के विनातिकीट प्रवाशांची वाढ झाली.

### एलपीजी सिलिंडर बाबत मोठा निर्णय...

मुंबई (स. गांवकरी) : राज्य सरकारने राज्यभर पाईप बंद नैसर्गिक वायू (पीएनजी) नेटवर्कचा विस्तार जलद गतीने करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या आहेत. ज्या भागांमध्ये पीएनजी सुविधा उपलब्ध आहे, त्या ठिकाणी घरगुती व व्यावसायिक वापरकर्त्यांनी ३० जूनपर्यंत एलपीजी सिलिंडरऐवजी पीएनजीचा वापर सुरू करावा, अशी अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. पीएनजी गॅस पुरवठा संस्थांकडे (सीजीडी) जूनपूर्वी नोंदणी करणे बंधनकारक आहे, अशी माहिती शिधावाटप नियंत्रक व नागरी पुरवठा संचालक चंद्रकांत डांगे यांनी सांगितले. पत्र सूचना कार्यालयाच्या वतीने मंत्रालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत डांगे बोलत होते. या वेळी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, शिधावाटप नियंत्रक व नागरी पुरवठा संचालक चंद्रकांत डांगे, कृषी विभागाचे संचालक सुनील बोरकर, इंधन विपणन कंपन्यांचे (बीपीसीएल) उपमहाव्यवस्थापक व राज्यस्तरीय समन्वयक उमेश कुलकर्णी उपस्थित होते.

### एरंडे याच्या पोलीस कोठडीत वाढ

नाशिक (स. गांवकरी) : कथित पत्रकार आणि स्वयंसेवी संस्थेचा अध्यक्ष असणाऱ्या रवींद्र एरंडे याला महिला लैंगिक शोषण प्रकरणी सोमवारी न्यायालयात हजर करण्यात आले असता १० एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली. आरोपी पोलीस तपासात सहकार्य करीत नसून त्याच्याकडून अनेक महत्वाच्या मुद्यांवर माहिती अपेक्षित असल्याचा युक्तिवाद सरकारी पक्षातर्फे करण्यात आला. सातपूर येथील एका महिलेचे मुलाला सरकारी नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवित एरंडेने लैंगिक शोषण केले. यासंदर्भात संबंधित महिलेने तक्रार केल्यावर एरंडेविरुध्द सातपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गरजू अनेक महिलांचे एरंडेने शोषण केल्याचे म्हटले जात आहे. त्याच्या कार्यालयातील तपासणीत १२० हून अधिक आक्षेपार्ह चित्रफिती पोलिसांना आढळून आल्या. पोलिसांनी एरंडेच्या घराचीही झडती घेतली. कार्यालयात आणि घरात काही नोंदी, महत्वाची कागदपत्रे, प्राण्यांचे अवयव आढळून आली. त्या चित्रफिती विषयी एरंडे मौन बाळगून आहे. न्यायालयाने दिलेल्या पोलीस कोठडीची मुदत संपल्याने सोमवारी त्यास पुन्हा न्यायालयात उपस्थित करण्यात आले.

## पार्थ पवारांमध्ये राजकीय परिपक्वता नाही?

मुंबई : (स. गांवकरी)

अजित पवार यांच्या निधनामुळे बारामती विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली आहे. या जागेवरून महायुतीकडून सुनेत्रा पवारांना उमेदवारी मिळाली असून त्यांनी बिनविरोध निवडणुकीसाठी प्रयत्न केले होते. परंतु, काँग्रेसने अशोक मोरे यांना उमेदवारी देऊन या ठिकाणची निवडणूक निश्चित केली आहे. यावरून पार्थ पवारांनी काँग्रेसवर टीका केली होती. या टीकेला उत्तर देताना शरद पवारांनी पार्थ पवारांच्या परिपक्वतेबद्दलच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. बारामती विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसने अशोक मोरे यांना उमेदवारी दिली. याबाबत पार्थ पवार म्हणाले, "बिनविरोधासाठी कोणाबरोबरही बोलणं झालेलं नाही. काय करायचं हे त्यांना कळायला हवं. ते काय करत आहेत हे सर्वांना माहितेय.



त्यांना नंतर काय त्रास होईल हे महाराष्ट्रात दिसेल. आम्ही कोणालाही फोन करणार नाही. जे काही नशिबात असेल ते होईल. फक्त मला याचं वाईट वाटतंय की महाराष्ट्रात काँग्रेसचा डाऊनफॉल सुरू आहे", असं पार्थ पवार म्हणाले होते. दरम्यान, आज तिसऱ्या टर्मची राज्यसभेत सदस्यपदाची शपथ घेतल्यानंतर शरद पवारांनी दिल्लीतून पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांना पार्थ पवारांच्या या वक्तव्याविषयी विचारण्यात आलं. कारण, शरद पवारांनी काँग्रेसच्या भूमिकेला अप्रत्यक्षपणे पाठिंबाच दिल्याचं स्पष्ट होतंय.

## 'राहुरी'त नाट्यमय घडामोडीनंतर प्राजक्त तनपुरे यांची माघार

### भाजपचे अक्षय कर्डिले यांचा अर्ज; पवार गटाकडून गोविंद मोकाटे



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

राहुरी पोटनिवडणुकीसाठी गेल्या काही दिवसांपासून रंगलेल्या अक्षय कर्डिले विरुद्ध प्राजक्त तनपुरे संभाव्य लढतीमध्ये तनपुरे यांनी सोमवारी ऐनवेळी माघार घेतल्याने नाट्यमय वळण मिळाले. आज अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी तनपुरे यांच्याशी चर्चा केल्यावर त्यांनी निवडणुकीतून माघार घेतली. या नाट्यमय घडामोडींमुळे महाविकास आघाडीची मोठी नामुष्की झाली. अखेर या गोंधळात राष्ट्रवादी काँग्रेसला (शरद पवार गट) अपक्ष उमेदवार गोविंद मोकाटे यांच्या गळ्यात अधिकृत उमेदवारीची माळ घालावी लागली. दरम्यान भाजपकडून अक्षय कर्डिले यांनी पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांसोबत आपला अर्ज दाखल केला. तनपुरे यांच्या माघारीमुळे कर्डिले यांच्या विरोधातील निवडणूक चुरस संपुष्टात आली आहे. राहुरी पोटनिवडणुकीसाठी आज, सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा अखेरचा दिवस होता. भाजपकडून कर्डिले आणि विरोधी आघाडीकडून तनपुरे यांचे अर्ज दाखल होण्याची चर्चा होती. तनपुरे यांचा अर्ज अपक्ष की राष्ट्रवादीकडून याचा घोळ सुरू होता. या पार्श्वभूमीवर सोमवारी सकाळपासून नाट्यमय घडामोडींना सुरुवात झाली. भाजपचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांची भेट घेतली.

#### मुख्यमंत्र्यांकडून आश्वासन – तनपुरे

प्रसारमाध्यमांशी बोलताना तनपुरे यांनी मुख्यमंत्र्यांशी राहुरीच्या विकासावर चर्चा झाल्याचे सांगितले. लष्कराच्या सराव क्षेत्रातील (के. के. रेंज) 'ॲम्युनेशन पार्क'साठी आणखी ७ हजार एकर जमीन संपादित होणार नाही. मुळा धरणातील गाळ उपसून अतिरिक्त ३.५ टीएमसी पाणी उपलब्ध केले जाईल, राहुरीतील रोजगारासाठी मोठा प्रकल्प उभारला जाईल, राहुरी नगरपालिकेला रस्ते विकासासाठी निधी उपलब्ध केला जाईल यावर सकारात्मक चर्चा झाल्याचे तनपुरे यांनी या वेळी जाहीर केले. तनपुरेंच्या या माघारीनंतर भाजप उमेदवार अक्षय कर्डिले यांनी प्रदेशाध्यक्ष चव्हाण मंत्री विखे यांच्या समवेत उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल केला.

## गुन्हेगारांना पोलीस प्रशासनाची जरब दिसेना ?

### सोनु कल्याणकर सह गेल्या तीन दिवसात ५ खून : शहरात भीतीचे वातावरण : पोलीस प्रशासनावर प्रश्न चिन्ह

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

गेल्या तिन दिवसात गँग वार सह पाच खून नांदेड शहर हादरले असून सर्व सामान्य गोर गरीब मजुरदार नागरीकांत भितीचे वातावरण पसरले आहे कारण तीन दिवसांत पाच जणांची हत्या झाल्यामुळे नांदेड शहरा मध्ये मोठ्या प्रमाणात गुंड व गुन्हेगारीच्या घटना दिवसें दिवस वाढत चालले असून या तिन दिवसात पाच खुन झाल्या मुळे सर्व सामान्य नागरीकांचा पोलीस प्रशासना वरचा विश्वास कमी होत आहे का, अशी प्रतिक्रिया सामान्य नागरिकांतून व्यक्त होत आहे. नागरिकांचा संताप लक्षात घेता पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना तात्काळ गुन्हेगारांना पकडा, असे आदेश दिल्यानंतर सोमवारी दुपारी झरी परिसरात मुख्य आरोपी अंकुश गंदमवार याच्या पायावर गोळी झाडून त्याच्यासह अन्य दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक खंडेराव यांनी दिली. सोमवारी सकाळी शिवसेनेचे शिंदे गटाचे युवा अध्यक्ष सोनू कल्याणकर यांचा श्रीनगर परिसरात मुख्य रस्त्यावर



खून करण्यात आला. सदरील घटनेचे वृत्त वाऱ्यासारखे शहरात पसरले, सोशल मीडियामार्फत पोलिस विभागावर आरोप प्रत्यारोप करण्यात आले. ही बाब पोलीस अधीक्षकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तात्काळ स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना आदेश दिल्यानंतर खंडेराय यांनी आपली टीम पूर्णतः कामाला लावली. यामध्ये अशी माहिती प्राप्त झाली आहे की, शिवसेना शिंदे गटाच्या युवा सेनेचे शहराध्यक्ष सोनू कल्याणकर यांचा कट रचून खून करण्यात आला आहे. जेलमधील गोलू मंगनाळे या गुन्हेगाराने त्याला मारण्याची टीप दिली असल्याचे सांगण्यात येत आहे यातील आरोपी रोहित लोट, अंकुश मानेसह जोगदंड यांना ताब्यात घेण्यात आले आहे. सोमवारी सकाळी साडेपाचच्या दरम्यान श्रीनगर परिसरात सोनू कल्याणकर हे आपल्या कुत्र्याला घेऊन नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉकला फिरत निघाले असता त्यावेळी पंचशील कापड दुकानाच्या बाजूस कुमार ड्रेसेस समोर जात असताना अचानक त्यांच्यासमोर चारचाकी वाहन येऊन थांबले त्या वाहनातून उतरलेल्या सहा ते सात हल्लेखोरांनी तलवारी, चाकूचा वापर करीत कल्याणकर यांच्यावर हल्ला केला. हल्लेखोरांनी त्यांच्या मानेवर, पाठीवर सपासप वार केले. त्यामुळे सोनू कल्याणकर यांचा जागीच मृत्यू झाला. मृत्यू झाल्यानंतर हल्लेखोरांनी पळ काढला. पोलीस विभागाला माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळाची पाहणी केली. पोलीस अधीक्षकांच्या आदेशा नंतर तात्काळ शोध मोहिम सुरू झाली. सदरील आरोपी झरी परिसरात असल्याची माहिती मिळताच उदय खंडेराय यांनी आपली टीम घेऊन त्या ठिकाणी रवाना झाले. आरोपी नजरेस पडताच पोउपनि मिलिंद सोनकांबळे यांनी फायर करीत आरोपीला थांबवण्याच्या सूचना केल्या. परंतु आरोपी पळ काढत असल्याचे लक्षात आल्यानंतर अंकुश गंदमवार या आरोपीच्या पायावर गोळी झाडत त्याला ताब्यात घेतले. इतर तीन आरोपी मात्र पळ काढण्याचा प्रयत्नात असताना तिघांनाही अटक करण्यात आली आहे. शहरात तिन दिवसात ५ खून झाल्याने भितीचे वातावरण निर्माण झाले आहे दि ४ एप्रिलच्या पहाटे गैंगवार झाले होते. शहरातील डी मार्ट परिसरात २ खून झाले तर १ खून शासकीय हॉस्पिटलमध्ये झाला. त्यात अर्जितसिंग चव्हाण, आवेज सब्यद खलील, मोहम्मद अरबाज मोहम्मद फारुख यांचा समावेश आहे. दरम्यान या खून प्रकरणी भाग्यनगर पोलिसांनी ६ जणांना अटक करून न्यायालयासमोर उभे केले असता त्यांना दि ८ एप्रिल पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आ-देश दिले आहेत. त्यानंतरची दि ५ एप्रिल रोजी शहरातील मुरमुरा गल्ली येथे तलवार व खंजर च्या साह्याने रणजीत सिंग तबेलेवाले उर्फ रज्जा याचा खून करण्यात आला.

## सहकार क्षेत्रात निवडणुकीचे धुमशान; वर्षभरात होणार निवडणुका

मुंबई : (स. गांवकरी)

यंदाच्या वर्षात राज्याच्या सहकार क्षेत्रात निवडणुकांचा धुरळा उडणार आहे. नैसर्गिक आपत्तींसह विविध कारणांमुळे गत दोन, तीन वर्षांपासून अनेक संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या होत्या. अशा सर्व संस्थांच्या आणि ज्या संस्थांचा कार्यकाळ पूर्ण झाला आहे, अशा ११, ०४१ संस्थांच्या निवडणुका चालू वर्षांत होणार आहेत. राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका विविध कारणांमुळे २०२४ पासून पुढे ढकलण्यात आल्या होत्या. लोकसभा आणि राज्य विधान सभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमुळे २०२४ मध्ये निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या होत्या. गतवर्षी अवकाळी, अतिवृष्टी, महापुरामुळे निर्माण झालेल्या अभूतपूर्व परिस्थितीमुळे आणि चालू वर्षांच्या सुरुवातीच्या दोन महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणुकीमुळे सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या होत्या. दरवर्षी साधारणपणे सहा ते सात हजार सहकारी संस्थांच्या निवडणुका होतात. पण, २०२४ पासून विविध कारणांमुळे संचालक मंडळाचा कार्यकाळ संपलेल्या संस्थांच्या निवडणुका होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे चालू वर्षांत ११,०४१ संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. त्यात अ गटातील ७४ संस्था, ब गटातील १,३३३ संस्था, क गटातील ३,९४१ संस्था आणि ड गटातील ५,६९३ संस्थांच्या निवडणुकी होणार आहेत. सध्या राहुरी विधानसभा मतदारसंघाची पोट निवडणूक सुरू असल्यामुळे अहिल्यानगरमधील आणि बारामती विधानसभेची पोट निवडणूक सुरू असल्यामुळे पुणे जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका स्थगित करण्यात आल्या आहेत. आचारसंहिता संपताच दोन्ही जिल्ह्यांतील सहकारी संस्थांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला जाणार आहे. संबंधित जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी प्राथमिक मतदार यादी तयार करणे आणि दुरुस्ती, सुधारणा करून ती अंतिम करण्याची जबाबदारी जिल्हा उपनिबंधकांना देण्यात आली आहे. मतदार यादी अंतिम झाल्यानंतर निवडणूक कार्यक्रम जाहीर करणे. निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचे काम राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांच्याकडून केले जाते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### घोडसरवाडी येथील लक्षमण घोडसरे यांचा वळू ठरला चॅम्पियन

- खिरविरे येथे भैरवनाथ यात्रेनिमित्त भव्य डांगी जनावरांचे प्रदर्शन उत्साहात

राजूर (स. गांवकरी) : अकोले तालुक्यातील खिरविरे येथे भैरवनाथ यात्रा उत्सव मंडळ व मुंबईकर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री भैरवनाथ यात्रा उत्सव भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.दरवर्षीप्रमाणे भव्य डांगी जनावरांचे प्रदर्शन उत्साहात पार पडले. घोडसरवाडी(समशेरपुर ) येथील लक्षमण रामा घोडसरे यांचा वळू यंदाचा चॅम्पियन ठरला.खिरविरे पंचक्रोशीतील ग्रामस्थांकडून चॅम्पियन वळूचे सर्वत्र कौतुक होत आहे.भैरवनाथ नवचैतन्य प्रतिष्ठान ग्रामस्थ खिरविरे यांनी श्री खेड भैरवनाथ येथुन ज्योत मिरवणूक काढण्यात आली. सकाळी डांगी जनावरांचे खरेदी विक्री व्यवहार नोंदणी केली.त्यानंतर रात्री देवाचा जागर भैरवनाथ प्रसन्न जागरण गोंधळ पार्टी पाडोशी यांचा मल्हारीचा कार्यक्रम झाला.भगवान भैरवनाथ मांडवाचा कार्यक्रम व क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिबा फुले महिला लेझीम पथक आकर्षक ठरले.जाणता राजा मित्र मंडळातर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.भव्य अशी भगवान भैरवनाथ व जोगेश्वरी मुखवटे काठीचा मिरवणूक काढण्यात आली.रात्री अश्विनी पुणेकर सोबत बाळासाहेब बेल्हेकर लोकनाट्य तमाशा मंडळाचा बहारदार असा कार्यक्रम साजरा झाला.त्यानंतर भव्य डांगी जनावरांची स्पर्धा बक्षिस वितरण तसेच भव्य जंगी कुस्ती हंगामा संपन्न झाला.यावेळी पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून यात्रा उत्सव भक्तीमय वातावरणात साजरा केला. यावेळी उपस्थित पंचक्रोशीतील ग्रामस्थ तरुण मित्र मंडळ महिला वर्ग उपस्थित होते.



### श्री महालक्ष्मी माता यात्रा उत्सव भक्तीमय वातावरणार संपन्न

राजूर (स. गांवकरी) : सोन्याच्या पावलांनी महालक्ष्मी आली ओवाळीतो कापूराने भक्ता प्रसन्न झाली.भावभक्तीच्या केल्या माळा | घातल्या महालक्ष्मीच्या गळा पायी वाजे पुंगरमाळा | केला ... सोहळा || अकोले तालुक्यातील पिंपळगाव नाकविंदा येथे श्री विठ्ठल मंदिर देवस्थान ट्रस्ट आयोजित श्री महालक्ष्मी माता यात्रोत्सव सालाबादप्रमाणे याही वर्षी भक्तीमय वातावरणार संपन्न झाली. सकाळी हनुमान जन्मोत्सव नंतर मांडव डहाळी, लेझीम खेळत भव्य ट्रॅक्टर व बैलगाडी सह वाजंत्री संबळताफा उंचखडक आकर्षक ठरले.त्यानंतर सर्व भाविक भक्तांना जय बाबाजी भक्त परिवारातर्फे चहा नाष्टा देण्यात आले.सकाळी सर्व देवांचे अभिषेक होमहवन सामुदायिक सत्यनारायण महापूजा त्यानंतर दुपारी भव्य काठी मिरवणुक काढण्यात आली. यात्रेनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.सर्व भाविकांनी या शिबिराचा लाभ घेतला.प्रमुख आकर्षक म्हणून फटाक्यांची आतिशबाजी तसेच किंगस्टार ब्रास बँड रात्री भव्य स्वर अमृत आर्केस्ट्रा नारायणगाव यांचा बहारदार असा कार्यक्रम झाला. समस्थ ग्रामस्थ पिंपळगाव नाकविंदा यांनी संपूर्ण यात्रेचे नियोजन करून यात्रा उत्सव भक्तीमय वातावरणात संपन्न झाली. यावेळी उपस्थित पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्त पिंपळगाव नाकविंदा ग्रामस्थ तरुण मित्र मंडळ महिला वर्ग उपस्थित होते.




### युवासेना शिरूर लोकसभा युवासंघटन बैठक लांडेवाडी येथे उत्साहात संपन्न !!

शिरूर (स. गांवकरी) : महाराष्ट्राचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्यनेते मा.ना.एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली आणि युवा खासदार डॉ.श्रीकांतजी शिंदे तसेच युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेशजी सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या “महाराष्ट्र युवासंघटन दौऱ्या” अंतर्गत शिरूर लोकसभा मतदारसंघातील विधानसभा निहाय महत्त्वपूर्ण बैठक शिवसेना युवानेते रमेशभाऊ येवले यांच्या लांडेवाडी, ता.आंबेगाव येथील शिवसेना मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयात उत्साहात पार पडली. बैठकीत आगामी १८ एप्रिल २०२६ रोजी मुंबई येथे होणाऱ्या युवासेनेच्या भव्य मेळाव्याच्या तयारीचा आढावा घेण्यात आला. प्रत्येक विधानसभा क्षेत्रातून जास्तीत जास्त युवकांचा सहभाग नोंदवण्यासाठी नियोजनबद्ध काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तालुका व गावनिहाय बैठका घेणे, महाविद्यालयीन युवकांशी संवाद वाढवणे, सोशल मीडियाच्या माध्यमातून युवकांपर्यंत विचार पोहोचवणे तसेच प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपल्या कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त युवकांना संघटनेशी जोडण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी संघटनात्मक दृष्ट्या शिस्तबद्ध व सातत्यपूर्ण काम करण्यावर भर दिला. पदाधिकारी आणि युवासैनिकांनी आपल्या क्षेत्रातील केलेल्या कामाचा आढावा सादर केला. आगामी काळात संघटना अधिक मजबूत करण्यासाठी वेळापत्रक ठरवून काम करावे, नियमित अहवाल सादर करावा आणि युवकांच्या प्रश्नांवर तत्परतेने भूमिका घ्यावी, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या. बैठकीस युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे तसेच युवासेना सचिव मा.किरणजी साळी, युवासेना कार्यकारिणी सदस्य मा. सचिन बांगर यांनी, पुणे जिल्हा परिषदेचे मा.उपाध्यक्ष अरुण गिरे, शिवसेना युवानेते रमेशभाऊ येवले यांनी बैठकीत उपस्थित राहून मार्गदर्शन केले. त्यांनी युवाशक्ती हीच शिवसेनेची खरी ताकद असल्याचे अधोरेखित करत प्रत्येक पदाधिकाऱ्याने जबाबदारीने संघटन वाढवण्याचे आवाहन केले. यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख बापूसाहेब शिंदे, गणेश सातव, धनंजय पठारे, सचिन घोलप यांच्यासह जुन्नर, आंबेगाव-शिरूर, खेड-आळंदी, शिरूर-हवेली व भोसरी या विधानसभा क्षेत्रांतील युवासेना पदाधिकारी व युवासैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रलंबित वीज प्रश्नावर टाकळी ढोकेश्वरमध्ये आंदोलन

## महावितरणच्या अधिकाऱ्यांना 'बांगड्यांचा आहेर' देत कार्यालयाला ठोकले टाळे

पारनेर : (स. गांवकरी)




पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या प्रलंबित वीज प्रश्नावरून गेल्या अनेक दिवसांपासून धुमसणाऱ्या असंतोषाचा आज अखेर उद्रेक झाला. गेल्या तीन वर्षांपासून मंजूर असूनही 'आरडीएसएस' (RDSS) योजनेतील सिंगल फेज वीज कनेक्शन देण्यास टाळाटाळ करणाऱ्या महावितरण प्रशासनाचा निषेध नोंदवण्यासाठी आज टाकळी ढोकेश्वर येथील उपअभियंता कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी जबाबदार अधिकाऱ्यांना 'बांगड्यांचा आहेर' देऊन कार्यालयाला कुलूप ठोकले. या 'टाळेबंद' आंदोलनामुळे महावितरण प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाली.

लोकनेते खासदार निलेश लंके यांच्या माध्यमातून पारनेर तालुक्यासाठी आरडीएसएस योजनेतंर्गत महत्त्वाची वीज कामे मंजूर करण्यात आली होती. मात्र, महावितरणच्या अधिकाऱ्यांची उदासीनता आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे अनेक गावांतील शेतकऱ्यांना अद्यापही अधिकृत वीज कनेक्शन मिळालेले नाही. हक्काच्या विजेसाठी शेतकरी गेल्या तीन वर्षांपासून कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही केवळ पोकळ आश्वासने मिळत असल्याने शेतकऱ्यांच्या संयमाचा बांध आज तुटला.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने हे आंदोलन पुकारण्यात आले होते. राष्ट्रवादीचे नेते रवींद्र राजदेव ,म्हसोबा झापचे सरपंच प्रकाश गाजरे, आणि राष्ट्रवादीचे नेते अमोल उगले यांच्या नेतृत्वाखाली सकाळी १०:३० वाजल्यापासून शेकडो शेतकरी कार्यालयाबाहेर जमले होते. रणरणत्या उन्हात सलग साडेतीन तास आंदोलकांनी ठिय्या मांडला. प्रशासनाचा निषेध करण्यासाठी शेतकऱ्यांनी सोबत आणलेल्या बांगड्यांचा आहेर अधिकाऱ्यांना सुपुर्द केला, ज्यामुळे वातावरण अधिकच तापले होते. शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका, तात्काळ काम सुरू करा अन्यथा कार्यालय उघडू देणार नाही, असा आक्रमक पवित्रा सरपंच प्रकाश गाजरे यांनी घेतला.

या आंदोलनात तालुक्याचे लक्ष वेधून घेणारी आंदोलकांची गर्दी जमली होती. यामध्ये सरपंच प्रकाश गाजरे, राष्ट्रवादीचे नेते रवींद्र राजदेव, राष्ट्रवादीचे नेते अमोल उगले यांच्यासह सरपंच अभिजीत झावरे, पांडुरंग आहेर, खंडू भाईक, कैलास सैद, प्रवीण सैद, अनिल आहेर, झांबर दरेकर, बाळासाहेब आहेर, संपत वाळुंज, विठ्ठल रोहकले, अशोक वाळुंज, शुभम काळे, दात्तराय वाळुंज, राजेंद्र दुधवडे, साहेबराव दुधवडे, संदीप गुंजाळ, काळूराम दुधवडे, लक्ष्मण कारंडे, गिरजु सूळ, लहू वाळुंज, ऋषिकेश वाळुंज, संजय पारधी, लहू भुतांबरे, विष्णू वाळुंज, बाबासाहेब वाळुंज, साहिल वाळुंज, भागचंद वाळुंज यांसह म्हसोबा झाप, वारणवाडी, कामटवाडी, वासुंदे, नांदूर पठार, सावरगाव, पळसपुर, काटाळवेढा, काकणेवाडी, खडकवाडी, पळशी या परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या आश्वासनानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.

## गारपीट व वादळी पावसाने पिकांचे मोठे नुकसान



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील वारंघुशीसह आदिवासी भागात २ एप्रिल २०२६ रोजी अचानक गारपीट व वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पावसामुळे गहू, हरभरा, कांदा, बाजरी, ज्वारी तसेच भाजीपाला पिकांचे नुकसान झाले असून जनावरांच्या चाऱ्याचाही मोठा फटका बसला आहे. उघड्यावर ठेवलेला चारा भिजून खराब झाल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले आहे.

या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त पिकांसह चाऱ्याचा तातडीने पंचनामा करून शासनाने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी समाजसेवक अनंत महादू घाणे यांच्यासह मारुती खाडे, देविदास भागडे, रामदास लांडगे, राजू भवारी, अंकुश भवारी, नामदेव लोटे, विठ्ठल भवारी, रविराज पोपेरे, शंकर घाणे, लक्ष्मण भागडे, गोविंद घाणे, चिंधु घाणे, ठकेश कडाळी, सुनील पवार व वारंघुशी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

## ॲसिड हल्ला पीडितेस शासन सर्वतोपरी मदत करणार

शिर्डी : (स. गांवकरी)

- महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे
- पीडित मुलीशी व तिच्या कुटुंबीयांशी आदिती तटकरे यांनी साधला संवाद



संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथील ॲसिड हल्ल्यातील पीडित मुलीची महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी रविवारी लोणी येथील प्रवरा रुग्णालयात जाऊन भेट घेतली. या अत्यंत निंदनीय घटनेतील पीडित मुलीच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे आणि तिच्या पुढील उपचारांचा संपूर्ण खर्च शासन करेल, अशी ग्वाही कु. तटकरे यांनी दिली. रुग्णालयात उपचार घेत असलेल्या या मुलीची प्रकृती सध्या स्थिर आहे. मात्र, तिचे वय लहान असून त्वचा संवेदनशील असल्याने तिला आणखी काही दिवस उपचारांची तसेच एका शस्त्रक्रियेची आवश्यकता आहे. डॉक्टर व प्रशासन तिची पूर्ण काळजी घेत आहेत. मुलीचे विशेष समुपदेशकाकडून समुपदेशन करण्यात आले असून, स्थानिक डॉक्टरांच्या मदतीने हे समुपदेशन पुढेही प्रभावीपणे सुरू ठेवण्याबाबत चर्चा झाली आहे. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे, या उपचारांचा कोणताही आर्थिक भार पीडितेच्या कुटुंबावर पडू दिला जाणार नाही. पीडितेस महिला व बालविकास विभागाच्या ‘मनोधैर्य’ योजनेअंतर्गत एक लाख रुपयांचे आर्थिक साहाय्य तात्काळ देण्यात येईल. यासोबतच, न्याय विभागाच्या ‘व्हिक्टिम कॉम्पेन्सेशन स्कीम २०२२’ अंतर्गत तिच्या कुटुंबाला तातडीची मदत म्हणून ३ लाख रुपये आधीच देण्यात आले आहेत. घटनेच्या दिवसापासूनच आपण पोलीस अधीक्षकांच्या संपर्कात असल्याचे सांगून मंत्री तटकरे म्हणाल्या, स्थानिक आमदारांनीही हा मुद्दा सभागृहात मांडला होता. सध्या आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांचा तपास वेगाने सुरू असून, विविध यंत्रणांची मदत घेतली जात आहे. कुटुंबाकडे काही अतिरिक्त माहिती असल्यास ती पोलिसांना द्यावी, तसेच त्यांच्या काही अपेक्षा असल्यास त्या सांगाव्यात, असे आवाहनही त्यांनी केले. या सांत्वनपर भेटीदरम्यान पीडित मुलीच्या कुटुंबातील तिची आई, मावशी व मामा उपस्थित होते. तसेच, आमदार काशिनाथ दाते, आमदार अमोल खताळ, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे आणि जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम हेही याप्रसंगी उपस्थित होते.

## अलंकापुरीत माऊली मंदिराच्या पाणदरवाजाचे लोकार्पण

- वेदमंत्रजयघोष - हरिनाम गजर - विधिवत पूजन उत्साहात
- श्री विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज सेवा मंडळाची सेवा रुजू

आळंदी : (स. गांवकरी)



येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरातील इंद्रायणी नदीच्या बाजूने माऊली मंदिरात प्रवेश करण्यासाठी असलेल्या पुरातन पाणदरवाजा दुरुस्ती करणे आवश्यक होते. या मुळे नवीन तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या नवीन तयार करण्यात आलेल्या नक्षीकामासह लाकडी भव्य पाणदरवाजाचे श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीच्या मार्गदर्शनात श्री विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज सेवा मंडळ आळंदी यांच्या समन्वय ठेवत उत्साहात लोकार्पण करण्यात आले. या वेळी वेदमंत्र जयघोष करीत विधिवत सागवानी लाकडाच्या भव्य पाणदरवाजाचे लोकार्पण करण्यात आले. माउली मंदिराचे पश्चिम बाजूस वैभवी दगडी कामाचे बांधकाम असून यात पुरातन पाणदरवाजा होता. तो आता नव्याने अस्सल सागवान लाकडाचा वापर करून तयार करण्यात आला. त्यावर कोरीव नक्षीकाम करण्यात आले आहे. हे काम श्री विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज सेवा मंडळाच्या वतीने परिश्रम पूर्वक मेहनत घेऊन सामाजिक बांधिलकीतून करण्यात आले आहे. श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे मार्गदर्शक सूचना व परवानगीने पाणदरवाजा विकसित करून देत सुतार समाजाने सेवा रुजू केली आहे. या लोकार्पण प्रसंगी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, पालखी सोहळा प्रमुख विश्वस्त राजेंद्र उमाप, विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे, विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, राजाभाऊ चौधरी, शंकर महाराज पांचाळ, श्री विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष रेणुकादास महाराज पांचाळ, आळंदीचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, माजी नगराध्यक्षा वैजयंता उमरगेकर, बबनराव कुऱ्हाडे, माजी विरोधी पक्ष गटनेते डी.डी.भोसले पाटील यांच्या सह आजी-माजी नगरसेवक, भाविक, नागरिक तसेच श्री विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज सेवा मंडळाचे पदाधिकारी, सेवक उपस्थित होते. संस्थान तर्फे समाज बांधवांचा या वेळी श्रींची प्रतिमा भेट देत सन्मान करण्यात आला. सुमारे साडे सहा लाख रुपये खर्च करून लक्षवेधी पाण दरवाजा विकसित केल्याने आळंदी मंदिराचे वैभवात वाढ झाली आहे. या सेवारत कार्याचे आळंदीतून कौतुक होत आहे.




## डिजिटल लॉकर सुविधा सुरू!

शिर्डी : (स. गांवकरी)

साईनगर रेल्वे स्टेशन येथे साई भक्तांच्या सोयीसाठी डिजिटल लॉकरची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. Dur Olt Fonzel कंपनीच्या माध्यमातून अत्यंत अल्प दरात ही आधुनिक व सुरक्षित लॉकर सेवा सुरू करण्यात आली आहे. या सुविधेमुळे साई भक्तांना आपले सामान सुरक्षितपणे लॉकरमध्ये ठेवून निर्धास्तपणे दर्शनासाठी जाता येणार आहे. सर्व लॉकर सीसीटीव्ही देखरेखीखाली असल्याने सुरक्षेची पूर्ण काळजी घेण्यात आली आहे. या कंपनीने भारतातील विविध रेल्वे स्थानकांवर अशा प्रकारच्या लॉकर सुविधा उपलब्ध करून दिल्या असून, साईनगर रेल्वे स्टेशनवरही ही सुविधा सुरू करण्यात आली आहे. या लॉकर सुविधेचे उद्घाटन रेल्वे प्रबंधक अनिल शुक्ला यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी कंपनीचे डायरेक्टर अनिश नागरे, सेल्स मॅनेजर सन्मुख सुंदरम तसेच रेल्वेचे विविध अधिकारी उपस्थित होते. यामध्ये एच. एल. मीना (IPF), सौरभ झा (CHI), अनिल तायडे, आनंद मेढे (CBS) आदींचा समावेश होता. यावेळी अनिश नागरे यांनी सांगितले की, “साई भक्तांसाठी ही सुविधा उपलब्ध करून देताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. लवकरच शिर्डी शहरातही ही लॉकर सुविधा सुरू करण्यात येईल.”

# आ. काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून कुंड रस्त्याची डागडुजी सुरू

निघोज : (स. गांवकरी)



आमदार काशिनाथ दाते यांच्याकडे मळगंगा देवी यात्रा समिती, मुंबई येथील व्यवसायीक शंकरशेठ रामचंद्र वराळ पाटील, निघोज ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांनी पाठपुरावा केल्याने कुंड रस्त्याची डागडुजी सुरू झाली असून येत्या गुरुवार पर्यंत हे काम पुर्ण होणार असल्याची माहिती मळगंगा देवी यात्रा समीतीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, सरपंच चित्राताई वराळ पाटील, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, संदीप पाटील वराळ जनसेवा फौडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, विठ्ठलराव कवाद, रुपेश ढवण यांनी दिली आहे. राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचा यात्रा उत्सव दि.१ एप्रिल पासून सुरू झाला आहे. मुख्य यात्रा शुक्रवार दि. १० एप्रिल पासून सुरू होत आहे. जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरातील कुंड यात्रा रविवार दि.१२ रोजी असून निघोज ते कुंड हा चार किलोमीटर अंतराचा रस्ता अत्यंत खराब झाला असल्याने रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी संबधीतांनी करण्यात आली होती. याबाबत ग्रामस्थ शिष्टमंडळ आमदार काशिनाथ दाते यांच्याकडे गेले होते. आ. दाते सर यांनी लगेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांना याबाबत सुचना दिल्याने हे काम तातडीने सुरू करण्यात आले आहे. कुंडावरील यात्रेसाठी पुणे,अहिल्यानगर तसेच मुंबई येथून लाखोंच्या संख्येने भावीक येत असतात. निघोज परिसरातील कुंड व शिरुर तालुक्यातील टाकळीहाजी या दोन ठिकाणी मळगंगा देवीचे मंदीरे असून दोन्ही ठिकाणचे दर्शन भावीकांना मिळत असल्याने भावीकांची संख्या मोठी असते. अहिल्यानगर जिल्हा, जुन्नर तालुका तसेच कल्याण,ठाणे, मुंबई येथील भावीक निघोज मार्गे कुंडावर जात असतात मात्र रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्याने हा चार किलोमीटर रस्ता अत्यंत खराब झाला असल्याने यात्रेकरू, देवीचे भावीक तसेच ग्रामस्थ यांना रस्त्याचा त्रास होऊ नये यासाठी ही डागडुजी सुरू केली असून या रस्त्याच्या डागडुजीचा समारंभ मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद सर, उपाध्यक्ष तथा मळगंगा कंट्रक्शन कंपनीचे अध्यक्ष अमृताशेठ रसाळ, सचिव शांताराम कळसकर, मळगंगा देवी यात्रा समीतीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, यात्रा समीतीचे विश्वस्त दिलीप ढवण, भास्करराव कवाद, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष ॲड.बाळासाहेब लामखडे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे संघटक मंगेश वराळ, विश्वस्त ॲड. ज्ञानेश्वर लामखडे, रमेशशेठ ढवळे, बबनराव ससाणे, रोहिदास लामखडे, विठ्ठलराव कवाद, रमेशशेठ वरखडे भास्कर ढवण आदींच्या हस्ते संपन्न झाला यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पारनेर तालुक्यातील तिर्थक्षेत्र तसेच पर्यटन स्थळ विकासासाठी आपण प्रयत्नशील आहोत, जगप्रसिद्ध रांजणखळगे हा राज्याचा अनमोल ठेवा आहे, देशपरदेशातील पर्यटक या ठिकाणी मोठ्या संख्येने येत असतात. तसेच राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवी ही नवसाला पावणारी देवस्थान आहे, वर्षभरात विविध उत्सवासाठी या ठिकाणी राज्यातून तसेच परराज्यातील लाखो भाविक मोठ्या संख्येने येत असतात, या ठिकाणच्या विकासासाठी आपले विशेष लक्ष आहे.

**- आमदार काशिनाथ दाते सर, (विधानसभा सदस्य)**








# पत्रकारांच्या सुख-दुःखात साथ देणे हीच समूहाची ओळख

## डॉ. विश्वासराव आरोटे : दैनिक समर्थ गांवकरी मेळाव्यात मार्गदर्शन; संघर्षातून उभ्या राहिलेल्या व्यक्तींनाच व्यासपीठ देण्याचा संकल्प!

**कोकमठाण : (स. गांवकरी)**

दैनिक समर्थ गावकरी समूहाच्या वतीने आयोजित संपादक, जिल्हा प्रतिनिधी व वार्ताहर मेळाव्यात संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी पत्रकारांच्या एकजुटीचे महत्त्व अधोरेखित करताना संघटित राहण्याचे आवाहन केले. "गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा..." या मंत्रोच्चाराने त्यांनी भाषणाची सुरुवात करत पत्रकार हे समाजाचे मार्गदर्शक असून त्यांच्या कार्याचा सन्मान करणे हीच खरी गुरुदक्षिणा असल्याचे सांगितले.

डॉ. आरोटे म्हणाले की, दैनिक समर्थ गांवकरी समूह दरवर्षी ग्रामीण भागातील पत्रकारांचा मेळावा आयोजित करतो. वर्षभर विविध भागात काम करणाऱ्या पत्रकारांना एकत्र आणणे, त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे आणि संवादाची साखळी मजबूत करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या व्यासपीठावर राजकीय नेते किंवा पदाधिकारी यांना प्राधान्य न देता संघर्षातून स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या व्यक्तींना आमंत्रित करण्याची परंपरा समूहाने जपली असल्याचे त्यांनी सांगितले.

याच अनुषंगाने शिवनेरी-जुन्नर भागातील शेतकरी कुटुंबातून संघर्ष करत पुढे आलेल्या बिग बॉस फेम तथा सरकार सेना संघटनेच्या अध्यक्षा दिव्या शिंदे यांना या कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. खासदार, आमदार किंवा मंत्री यांचा कार्यकाळ मर्यादित असतो; मात्र संघर्षातून उभ्या राहिलेल्या व्यक्ती समाजाला प्रेरणा देतात, त्यामुळे अशा व्यक्तींना व्यासपीठ देणे ही समूहाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी समूहाचे मालक नानजीभाई ठक्कर, कार्यकारी संपादक नवनाथ जाधव, नवी मुंबईचे संपादक दशरथ चव्हाण, व्यवस्थापक संजय फुलसुंदर यांच्यासह राज्यभरातील प्रतिनिधी व वार्ताहर उपस्थित होते.

डॉ. विश्वासराव आरोटे पुढे म्हणाले की, समूहातील बहुतांश पत्रकार हे तळागाळातील सर्वसामान्य कुटुंबातून आलेले आहेत. संघर्षमय परिस्थितीत काम करत असताना त्यांना मानसिक आधार मिळावा आणि त्यांच्या प्रश्नांकडे लक्ष दिले जावे यासाठी हा मेळावा महत्त्वाचा आहे. पत्रकार वर्षभर जनतेचे प्रश्न मांडतात; मात्र पत्रकारांवर संकट आले तर त्यांच्या समस्या ऐकून घेणे आणि मदतीचा हात पुढे करणे ही संघटनेची जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रासह गोवा, दिल्ली, बेळगाव, गुजरात, छत्तीसगड आदी राज्यांत पत्रकारांच्या मदतीसाठी आपण काम केले असल्याचे त्यांनी नमूद केले. "सुखात नव्हे तर दुःखात साथ देणे" हीच संघटनेची भूमिका असल्याचे सांगताना त्यांनी अनेक प्रसंगांचा उल्लेख केला. पत्रकारांवर अन्याय झाला किंवा दुर्दैवी घटना घडली तर संबंधित संस्थांकडून अपेक्षित मदत मिळत नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. अशा वेळी संघटित पत्रकारांनी एकमेकांच्या पाठीशी उभे राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

> डॉ. आरोटे पुढे म्हणाले की, सुमारे २७ हजार पत्रकारांच्या नेतृत्वाची जबाबदारी सांभाळताना कोणत्या संघटनेचा पत्रकार आहे यापेक्षा तो पत्रकार आहे हे महत्त्वाचे मानले जाते. संकटात असलेल्या पत्रकाराला तत्काळ मदत करणे हेच आपले कर्तव्य आहे. पत्रकारांनी समाजाचे प्रश्न मांडताना आपल्या कुटुंबाकडेही लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

पत्रकारितेतील अस्थिरता, मान्यता व संरक्षणाचा अभाव या मुद्द्यांवर भाष्य करत त्यांनी शासनाकडून पत्रकारांच्या व्याख्येबाबत स्पष्ट धोरण नसल्याचे सांगितले. अनेक वर्षे काम करूनही पत्रकारांना पेन्शन, विमा किंवा इतर सुविधा मिळत नाहीत. त्यामुळे पत्रकारांनी एकत्र येऊन आपल्या हक्कांसाठी लढा देण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

पत्रकारांवर अन्याय झाल्यास किंवा त्यांना आर्थिक अडचणी निर्माण झाल्यास समूह त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

ते म्हणाले की, अनेकदा पत्रकारांनी मेहनतीने काम करूनही जाहिरातींचे किंवा कामाचे पैसे मिळत नाहीत. अशा वेळी पत्रकारांवर उलट गुन्हे दाखल केले जातात, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. "जर एखाद्या पत्रकाराने फसवणूक केली असेल तर तो गुन्हा आहे; पण लोकांनी पैसे न देता उलट पत्रकारांवर गुन्हे दाखल करणे चुकीचे आहे. वीस वर्षे पत्रकारिता करून व्यवसाय गमावलेला असताना त्याच्यावर कारवाई करणे योग्य नाही," असे त्यांनी स्पष्ट केले.

> दैनिक समर्थ गांवकरी समूहाने पत्रकारांसाठी विमा योजना, आर्थिक मदत, सन्मान सोहळे आणि मार्गदर्शन कार्यक्रम राबविले असून पुढेही हे कार्य सुरू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. "आपण काय देतो यापेक्षा देण्यामागचा हेतू महत्त्वाचा असतो. पत्रकारांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी आपण कटिबद्ध आहोत," असे सांगत त्यांनी सर्व पत्रकारांना संघटित राहण्याचे आवाहन केले.

पत्रकार कुटुंबांची परिस्थिती लक्षात घेणे आवश्यक असल्याचे सांगताना त्यांनी समूहाच्या माध्यमातून गरजू पत्रकारांना मदत केल्याची उदाहरणे दिली. एखाद्या पत्रकाराच्या मुलीच्या लग्नासाठी ५० हजार रुपयांची मदत, गॅस कनेक्शन, वैद्यकीय सहाय्य, आपत्कालीन आर्थिक मदत अशा विविध स्वरूपात मदत करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. "ही मदत उपकार म्हणून नाही; विश्वासाच्या नात्याने केली जाते," असे त्यांनी नमूद केले.

# पत्रकारांवर सरकारपेक्षाही मोठी जबाबदारी : दिव्या शिंदे

- तळागाळातील प्रश्न मांडणाऱ्या पत्रकारांचे कार्य समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे
- माझ्या आयुष्यातील पहिली बातमी दैनिक समर्थ गांवकरीने प्रसिद्ध केली होती – दिव्या शिंदे
- काही गावात एसटी बससेवाही उपलब्ध नसते; मात्र समर्थ गांवकरी वृत्तपत्र मात्र नियमित पोहोचते, हीच पत्रकारितेची ताकद – दिव्या शिंदे

**कोकमठाण (कोपरगाव): (स. गांवकरी)**




दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने आत्मा मलिक ध्यानपीठ, कोकमठाण येथे आयोजित संपादक, जिल्हा प्रतिनिधी व वार्ताहर मेळाव्यात बिग बॉस फेम तथा सरकार सेना संघटनेच्या अध्यक्षा दिव्या शिंदे यांनी पत्रकारितेच्या भूमिकेवर सविस्तर मार्गदर्शन केले. पत्रकारांवर सरकारपेक्षाही मोठी जबाबदारी असून सामान्य जनतेचा आवाज सरकारपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार करत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

आपल्या भाषणात त्या म्हणाल्या की, निवडून आलेले सरकार पाच वर्षांसाठी काम करते; परंतु पत्रकारांचे कार्य आयुष्यभर चालणारे असते. त्यामुळे जनतेच्या अपेक्षा पत्रकारांकडून अधिक असतात. लोकशाहीमध्ये सामान्य माणसाचा आवाज बुलंद करण्यासाठी पत्रकारांची लेखणी अत्यंत प्रभावी माध्यम आहे. तळागाळातील नागरिकांचे प्रश्न, दुःख, वेदना आणि अन्याय शासनापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी पत्रकारांच्या खांद्यावर आहे. जनता अनेकदा आपल्या समस्या मांडण्यासाठी पत्रकारांवर अवलंबून असते, असे त्यांनी नमूद केले.

दिव्या शिंदे यांनी आपल्या वैयक्तिक आठवणींनाही उजाळा दिला. त्यांनी सांगितले की, त्यांच्या आयुष्यातील पहिली बातमी दैनिक समर्थ गांवकरीने प्रसिद्ध केली होती. लहानपणीपासून या वृत्तपत्राशी त्यांचा जवळचा संबंध असून त्यांच्या घरात नियमितपणे हे वृत्तपत्र येत असे. ग्रामीण भागात सुविधा नसतानाही हे वृत्तपत्र तळागाळात पोहोचत असल्यामुळे सामान्य लोकांना देश-राज्यातील घडामोडींची माहिती मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. काही भागात बससेवाही उपलब्ध नसते; मात्र वृत्तपत्र मात्र नियमित पोहोचते, हीच पत्रकारितेची ताकद असल्याचे त्यांनी नमूद केले.

सामान्य जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी वार्ताहरांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. पाऊस, ऊन, वादळ यांची पर्वा न करता तळागाळात जाऊन सत्य परिस्थिती मांडणाऱ्या पत्रकारांचे कार्य कौतुकास्पद आहे. अनेकदा दबाव, विरोध आणि अडथळ्यांचा सामना करत पत्रकार समाजातील वास्तव समोर आणतात. वार्ताहर होणे सोपे नसून सत्यासाठी लढण्याचे धैर्य आवश्यक असते, असे त्यांनी स्पष्ट केले.

पत्रकार, डॉक्टर आणि कलाकार या तिन्ही क्षेत्रांतील व्यक्तींना जात-पात नसून त्यांची सामाजिक बांधिलकी महत्त्वाची असते. समाजात समता, न्याय आणि लोकशाही मूल्ये जपण्याचे कार्य पत्रकार करतात. "मनगटात शिवबा आणि डोक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार असतील तर कोणालाही हरवता येत नाही," असे सांगत त्यांनी पत्रकारांनी निडर आणि निपक्षपातीपणे काम करण्याचे आवाहन केले.

दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या कार्याचे कौतुक करताना त्यांनी सांगितले की, या वृत्तपत्राने तळागाळातील लोकांना आवाज दिला आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातही हे वृत्तपत्र पोहोचत असून जनतेला जागृत करण्याचे काम करत आहे. लहानपणी वृत्तपत्रातील लेख, बातम्या तसेच छोट्या गोष्टी वाचून प्रेरणा मिळत असे, असेही त्यांनी सांगितले.

पत्रकारांनी समाजाच्या प्रश्नांसाठी एकत्र येऊन काम करावे. "तुम्ही पुढे आहात, आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. तुम्ही जनतेसाठी आवाज उठवा, आम्ही तुमच्या समर्थनात उभे राहू," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पत्रकारांनी निर्भीडपणे काम करत राहावे, समाजातील अन्यायाविरुद्ध आवाज उठवावा आणि लोकशाही बळकट करावी, असे आवाहन त्यांनी केले.

शेवटी त्यांनी दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. पत्रकारांना कोणत्याही प्रकारची गरज भासल्यास आपण व आपली संघटना नेहमी त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील, असा शब्द त्यांनी यावेळी दिला. "तुम्ही आहात तर आम्ही आहोत," असे सांगत त्यांनी पत्रकारांच्या कार्याचा गौरव करत आपले भाषण समाप्त केले.

## पतीवर जीवघेणा हल्ला; गुन्हा दाखल

**लोणीकाळभोर : (समर्थ गांवकरी)**

घरगुती वादातून विवाहितेने माहेरच्या नातेवाईकांकडून पतीवर कटरने जीवघेणा हल्ला केला असल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पत्नी, सासू, मावस सासू व मेव्हण्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेत योगेश रामचंद्र काळभोर हे जखमी झाले आहेत.


### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/४७/२०२६ — अकोले दि.०६/०४/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्रीम. संस्कृती जालिंदर बेनके, रा.मोहदरी**, ता. सिन्नर, जि. नाशिक यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये अर्जदार **यांचा स्वतः संस्कृती जालिंदर बेनके यांचा जन्म दि. २७/०१/२००८ रोजी मुथाळणे** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **मुथाळणे**, ता. अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्रीम. संस्कृती जालिंदर बेनके, रा.मोहदरी**, ता. सिन्नर, जि. नाशिक **यांचा स्वतः संस्कृती जालिंदर बेनके यांचा जन्म दि. २७/०१/२००८ रोजी मुथाळणे** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **मुथाळणे**, ता.अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. ०६/०४/२०२६ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

कामगिरी क्लर्क

हुकूमावरुन,
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अकोले


# आत्मिक मूल्यांवर आधारित वस्तुनिष्ठ पत्रकारितेची गरज

## आत्मा मलिक ध्यानपीठावर मेळाव्यात संत परमानंद महाराजांचे मार्गदर्शन!

**कोकमठाण (कोपरगाव): (स. गांवकरी)**

दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या संपादक, जिल्हा प्रतिनिधी व वार्ताहर मेळाव्यात संत परमानंद महाराज यांनी पत्रकारितेच्या भूमिकेवर आध्यात्मिक व मूल्याधिष्ठित मार्गदर्शन करताना वस्तुनिष्ठ, पारदर्शक आणि समाजहितासाठी कार्य करणारी पत्रकारिता काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. आत्मा मलिक ध्यानपीठ, कोकमठाण येथे आयोजित मेळाव्यात ते बोलत होते.

आपल्या भाषणात संत परमानंद महाराज म्हणाले की, अखिल विश्वामध्ये प्रत्येक जीवाचे जीवन नियंत्रित करणारी परम वैश्विक शक्ती आपल्या सर्वांच्या अंतर्यामी विराजमान आहे. त्या जीवनशक्तीला वंदन करून या पवित्र स्थळी पत्रकारांचा मेळावा आयोजित केल्याबद्दल दैनिक समर्थ गांवकरी समूहाचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे व सर्व सहकाऱ्यांचे त्यांनी स्वागत केले. राज्याच्या विविध भागांतून उपस्थित संपादक, उपसंपादक व वार्ताहरांचेही त्यांनी अभिनंदन करत पत्रकारितेच्या माध्यमातून राष्ट्रसेवा करण्याचे आवाहन केले. आजच्या बदलत्या जीवनशैलीमध्ये मानवी जीवनाला स्थैर्य देण्यामध्ये पत्रकारितेची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. पत्रकारितेने नेहमी वस्तुनिष्ठ, सत्यनिष्ठ आणि पारदर्शक असावे. सत्यता, परिपक्वता, गोपनीयता आणि निपक्षपातीपणा जपत समाजहितासाठी लेखणी चालविणे ही प्रत्येक वार्ताहराची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. लोकशाही बळकट करण्यासाठी पत्रकारांनी आपली व्यक्तिगत मूल्ये जपत समाजहिताला प्राधान्य द्यावे, असेही त्यांनी नमूद केले. आत्मा मलिक ध्यानपीठाच्या आध्यात्मिक परंपरेचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, गेल्या अनेक वर्षांपासून या पवित्र स्थळी अखंड ध्यान व साधना सुरू आहे. सद्गुरू आत्मा मालिक माऊली यांनी मौनाच्या माध्यमातून विश्वाला संदेश दिला असून कोणतेही माध्यम न वापरता प्रभावी आध्यात्मिक कार्य उभे केले आहे. ही भूमी आत्मिक ऊर्जेची असल्याने येथे होणारा पत्रकारांचा मेळावा हा केवळ व्यावसायिक नव्हे तर आत्मिक संमेलन असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. जनसामान्यांची जागृती, समाजातील अस्थिरता दूर करून स्थैर्य निर्माण करणे आणि लोकशाही मूल्ये दृढ करणे यासाठी पत्रकारितेची भूमिका अत्यंत प्रभावी असल्याचे सांगत त्यांनी पुढील काळात समाजहिताच्या दिशेने सकारात्मक पत्रकारिता करण्याचे आवाहन केले. दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या कार्याचे कौतुक करत त्यांनी आयोजकांना शुभेच्छा दिल्या.





मेळाव्यास राज्यभरातील संपादक, जिल्हा प्रतिनिधी, वार्ताहर व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# कन्या विद्यालयात क्रीडा दिन उत्साहात साजरा



**श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)**

श्रीगोंदा येथील श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयात आंतरराष्ट्रीय क्रीडा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू कु. धनश्री फंड आणि महाराष्ट्र केसरी सुवर्णपदक विजेती कु. आश्लेषा बगाडे यांचा विद्यालयाच्या वतीने गौरव करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी कु. तेजस्विनी श्रीधर गिरमकर हिने राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावत रौप्यपदक मिळविल्याबद्दल तिचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका श्रीमती वर्षा भोईटे या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून इंटरनॅशनल कुस्ती अकॅडमीचे प्रशिक्षक श्री हनुमंत फंड (मेजर), पंढरपूर नगरपालिकेचे नगरसेवक श्री प्रशांत शिंदे, सौ. पूजा फंड, सौ. तृप्ती शिंदे, श्री बापूराव औटी तसेच विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री बाळासाहेब शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांना आदरांजली वाहण्यात आली. तसेच गेल्या वर्षभरात विविध क्रीडा प्रकारात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या शंभराहून अधिक खेळाडूंचा आणि त्यांना मार्गदर्शन करणारे क्रीडा विभाग प्रमुख श्री किरण कोकणी व श्री विठ्ठल होले यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गुरुकुल प्रमुख श्री किरण शिंदे यांनी केले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.



ठाणे : दिव्यात भारतीय जनता पक्षाची संघटनात्मक बैठक व काहींचा पक्ष प्रवेश सोहळा उत्साहात संपन्न झाला. आमदार निरंजन डावखरे, ठाणे शहर सरचिटणीस विक्रम भोईर, नगरसेविका वेदिका पाटील, दिवा मंडळ अध्यक्ष सचिन भोईर यांच्यासह दिवा शहरतील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**( फोटो - संतोष पडवळ )**

## थोडक्यात बातम्या...




### व्यंकनाथ विद्यालयाच्या मनीषा चव्हाण यांना राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या श्री व्यंकनाथ विद्यालय, लोणी व्यंकनाथ येथील उपशिक्षिका श्रीमती मनीषा रोहिदास चव्हाण यांना संगमनेर येथील समता प्रतिष्ठानच्या वतीने राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शिक्षक पदवीधर आमदार सत्यजित तांबे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. समता प्रतिष्ठानतर्फे गेल्या तीन वर्षांपासून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. प्रा. विजय साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली या पुरस्काराची निवड प्रक्रिया पार पडते. मूल्यवर्धन प्रशिक्षणाच्या अंतर्गत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल श्रीमती चव्हाण यांची या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. सदर पुरस्कार वितरण सोहळा दि. ५ एप्रिल रोजी संगमनेर येथे उत्साहात पार पडला. यावेळी समता प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ. निशिगंधा साळवे, प्रा. विजय साळवे, त्यांच्या मातोश्री द्वारकाबाई साळवे यांच्यासह आमदार सत्यजित तांबे आणि इतर मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर श्रीमती मनीषा चव्हाण यांचा श्री व्यंकनाथ विद्यालयात बाळासाहेब जठार सर व सहकारी शिक्षकांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे, जिल्हा बँकेच्या संचालिका अनुराधाताई नागवडे, संस्थेचे निरीक्षक सचिनराव लगड, तसेच स्कूल कमिटीचे अध्यक्ष डी. आर. आबा काकडे आणि विश्वस्त मंडळाने अभिनंदन केले आहे.

### अकोले पोलीस स्टेशनमधील जप्त व बेवारस वाहनांचा ७ दिवसांत ताबा घ्या

अकोले (स. गांवकरी) : अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले पोलीस स्टेशनच्या आवारात मागील काही वर्षांपासून विविध कंपन्यांच्या मोटारसायकली, चारचाकी वाहने तसेच ट्रकसारखी अनेक वाहने गुन्हे अभिलेखातील तसेच बेवारस स्थितीत जप्त अवस्थेत पडून आहेत. संबंधित वाहनांचे मालक अद्यापपर्यंत ताबा घेण्यासाठी पुढे आलेले नसल्याची माहिती अकोले पोलिसांनी दिली आहे. या पार्श्वभूमीवर ज्या नागरिकांची मोटारसायकल, चारचाकी वाहने किंवा ट्रक अकोले पोलीस स्टेशन येथे जमा अथवा जप्त आहेत, त्यांनी आपल्या वाहनांची नोंदणी कागदपत्रे समक्ष सादर करून पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. कागदपत्रांची अधिकृत पडताळणी करून पुढील सात दिवसांच्या आत संबंधितांनी आपली वाहने ताब्यात घ्यावीत, असेही नमूद करण्यात आले आहे. दिलेल्या मुदतीत कोणीही वाहन ताब्यात घेतले नाही, तर संबंधित वाहनांचा नियमाप्रमाणे लिलाव करून पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यात येणार असल्याचा इशारा अकोले पोलीस स्टेशनच्या वतीने देण्यात आला आहे. अधिक माहितीसाठी नागरिकांनी अकोले पोलीस स्टेशनशी दूरध्वनी क्रमांक ०२४२४-२२१३३३ वर संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस निरीक्षक, अकोले पोलीस स्टेशन, जिल्हा अहिल्यानगर यांनी केले आहे.

### शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रात नंदकुमार कुरुमकर यांचे वेगळे स्थान : प्रशांत भोईटे



श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : ज्येष्ठ पत्रकार तथा शिक्षण क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तिमत्त्व नंदकुमार कुरुमकर यांनी आपल्या कार्यकाळात शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रात भरीव योगदान देत स्वतंत्र अशी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या शांत, संयमी स्वभावामुळे त्यांनी अनेकांशी आत्मीयतेचे संबंध जोडले, असे गौरवोद्गार इंदिरा गांधी पॉलिटेक्निक, बेलवंडीचे प्राचार्य डॉ. प्रशांत भोईटे यांनी काढले. नंदकुमार कुरुमकर यांच्या प्रदीर्घ ३८ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्ती निमित्त इंदिरा गांधी पॉलिटेक्निकतर्फे त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्राचार्य भोईटे बोलत होते. पुढे ते म्हणाले की, सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे (बापू) यांच्या विचारांचा व संस्कारांचा वारसा जपत कुरुमकर यांनी ज्ञानदानासारख्या पवित्र क्षेत्रात उल्लेखनीय सेवा बजावली आहे. निवृत्तीनंतरही ते शिक्षण क्षेत्राशी नाळ कायम ठेवतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी विभागप्रमुख हवालदार सर, नातू सर, इथापे सर, शिंदे सर, रमेश पाचपुते सर, बिपिन इथापे सर, बिपिन गायकवाड सर, प्रतीक लाडाने यांच्यासह पॉलिटेक्निकचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन बिपिन इथापे यांनी केले. सत्काराला उत्तर देताना नंदकुमार कुरुमकर भावूक झाले. ते म्हणाले की, सहकार महर्षी नागवडे बापूंनी मला वयाच्या २३ व्या वर्षी शिक्षण संस्थेत काम करण्याची संधी दिली. या नोकरीमुळे मला मुलांना उच्च शिक्षण देता आले आणि कुटुंबाची प्रगती साधता आली. नागवडे कुटुंबाचे मी सदैव ऋणी राहीन. तसेच, बापूंच्या पश्चात कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे यांनीही मला नेहमी योग्य न्याय दिला, असे त्यांनी नमूद केले. शेवटी, सन्मानाबद्दल त्यांनी प्राचार्य डॉ. प्रशांत भोईटे व संस्थेचे आभार मानले.

# गैरसमजांच्या सावलीतले निसर्गमित्र : वटवाघळे

**(स. गांवकरी)**

> डासांवर नैसर्गिक नियंत्रण ठेवणारी वटवाघळे ही पर्यावरणाची मौल्यवान संपत्ती आहेत. त्यांचे संवर्धन करणे ही केवळ पर्यावरणाचीच नव्हे, तर आपल्या सर्वांची देखील सामूहिक जबाबदारी आहे.
> **- प्रा.कीर्ती गुंजाळ प्राणीशास्त्र विभाग, अगस्ती महाविद्यालय, अकोले**

वटवाघळे म्हटले की, आजही समाजमनात भीती, गैरसमज आणि नकारात्मक प्रतिमा दिसून येते. अंधारात उडणारे, घरात शिरणारे आणि रोग पसरवणारे प्राणी अशी ओळख त्यांना दिली जाते. मात्र ही प्रतिमा अज्ञानातून निर्माण झालेली आहे. वास्तवात वटवाघळे ही निसर्गासाठी, पर्यावरणासाठी आणि मानवी आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त अशी सजीवसृष्टी आहे. विशेषतः डासांवर नियंत्रण ठेवण्यात त्यांची भूमिका अतिशय मोलाची आहे.

वटवाघळे एकसारखी नसून त्यांच्या विविध प्रजाती आढळतात. काही वटवाघळे फलाहारी असून ती फळे, फळांचा रस आणि पराग खातात, तर काही वटवाघळे कीटकभक्षी असून डास, माश्या, पतंग तसेच शेतीस हानीकारक कीटकांवर उपजीविका करतात. फलाहारी वटवाघळांमुळे झाडांचे परागीकरण आणि बियांचा प्रसार होतो, त्यामुळे जंगल आणि फळबागांचे संवर्धन होते. तर कीटकभक्षी वटवाघळे नैसर्गिकरीत्या कीटकसंख्या आटोक्यात ठेवतात.

कीटकभक्षी वटवाघळे प्रामुख्याने रात्री सक्रिय असतात. संशोधनानुसार एक वटवाघूळ एका रात्रीत शेकडो डास भक्ष्य म्हणून खाते. त्यामुळे डासांची संख्या नैसर्गिकरीत्या नियंत्रणात राहते. रासायनिक फवारणीच्या तुलनेत हा उपाय अधिक सुरक्षित, स्वस्त आणि पर्यावरणस्नेही आहे. अंधारात अचूक शिकार करण्यासाठी वटवाघळे 'इकोलोकेशन' या अद्वितीय क्षमतेचा वापर करतात. अतिसूक्ष्म ध्वनीलहरी हवेत सोडून त्या प्रतिध्वनीच्या आधारे कीटकांचे स्थान शोधले जाते. पूर्ण अंधारातही अचूकतेने शिकार करण्याची ही क्षमता वटवाघळांना निसर्गातील एक विलक्षण जीव ठरवते. अकोले तालुका हा पश्चिम घाटाच्या पायथ्याशी वसलेला, जंगल, नदीकाठ आणि फळझाडांनी समृद्ध असा परिसर आहे. त्यामुळे या भागातफलाहारी तसेच कीटकभक्षी वटवाघळे दोन्ही प्रकार आढळतात. फळबागा, मोठी झाडे, जुनी इमारती, पूल तसेच नदी व ओढ्यांच्या आसपास रात्रीच्या वेळी वटवाघळे उडताना दिसून येतात, अशी निरीक्षणे स्थानिक पातळीवर वारंवार नोंदली गेली आहेत. वटवाघळांमुळे डासांचे नियंत्रण झाल्यास मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया यांसारख्या आजारांचा धोका लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतो. त्याचबरोबर शेतीचे नुकसान घटते आणि कीटकनाशकांचा वापर कमी होतो. याचा थेट फायदा मानवी आरोग्याबरोबरच जैवविविधतेला होतो. वटवाघळांचा अभाव निर्माण झाल्यास डासांची संख्या अनियंत्रित वाढून सार्वजनिक आरोग्यव्यवस्थेवर मोठा ताण येऊ शकतो. वटवाघळांचे आयुष्य इतर लहान सस्तन प्राण्यांपेक्षा तुलनेने जास्त असते. ती सहसा मानवांपासून दूर राहणे पसंत करतात आणि विनाकारण माणसांवर हल्ला करत नाहीत. वटवाघळांमुळे रोग पसरतात हा समज बहुतांशी अतिशयोक्त आहे. थेट संपर्क किंवा चावा घेतल्यासच धोका संभवतो, तोही अत्यंत दुर्मीळ आहे. सामान्य परिस्थितीत वटवाघळे मानवासाठी धोकादायक ठरत नाहीत.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महा अभियानाचे उद्घाटन

**अकोले : (स. गांवकरी)**

"भारताला स्वातंत्र्य रक्त सांडून मिळाले असून, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी स्वातंत्र्यासाठी प्रचंड संघर्ष केला आहे. मात्र, भारतीय संविधानाचे काँग्रेस आणि नेहरू गांधी घराण्याने खून केले आहे." भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यालय प्रभारी श्री. रवीजी आनासपुरे यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासावर महत्वपूर्ण मते व्यक्त केली. अकोले येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महा अभियानाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राजूरच्या माजी सरपंच श्रीमती हेमलता पिचड होत्या. यावेळी अकोले एज्युकेशन संस्थेचे कायम विश्वस्त गिरजाजी जाधव, अध्यक्ष सुनील दातीर, सचिव सुधाकर देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष यशवंत आभाळे आणि इतर मान्यवर उपस्थित होते. संविधानासाठी लढणारा भाजपा हा पक्ष आहे. काँग्रेसच्या काळात अनेक वेळा संविधान बदलवले आहे. भाजपा कार्यकर्ता सत्ता ही सेवेसाठी मानतो,भाजपा हा कार्यकर्त्यांच्या त्यागावर उभारलेला पक्ष असून पक्षातील पद ही मिरवायची नसून दायित्वाची आहेत. असेही मत रवीजी अनासपुरे यांनी व्यक्त केले. यावेळी सहा सत्रात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष श्री. रोहित चौधरी यांनी वैचारिक अधिष्ठानावर भाष्य केले यावेळी सोमदास पवार हे अध्यक्षस्थानी होते. भाजपा इतिहास आणि पक्षाचा विस्तारा यावर जिल्हा महामंत्री सीताराम भांगरे यांनी मार्गदर्शन केले त्यावेळी अगस्ती साखर कारखान्याचे माजी संचालक भाऊसाहेब वाकचौरे यांनी अध्यक्षस्थान भूषवले.

# वरखेडच्या श्री लक्ष्मी देवीची मंगळवारी यात्रा

**नेवासा : (स. गांवकरी)**



महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या नेवासा तालुक्यातील वरखेडच्या श्री लक्ष्मी देवीची मंगळवारी ७ एप्रिल २०२६ रोजी यात्रा भरत असून यात्रेची सर्व तयारी पूर्ण झाली असून भाविकांच्या स्वागतासाठी वरखेडनगरी सज्ज झाली असून यंदा यात्रेवर नियंत्रण ठेवण्यासाठी १६ सीसीटीव्ही कमेरे मंदिर परिसरात लावण्यात आले असल्याचे देवस्थानचे श्री कडूपाटील गोरे यांनी सांगितले सोमवार दि.०६ एप्रिल रोजी रात्री ०८:३० वा. होम कार्यक्रम होणार असून मंगळवार दि.७ एप्रिल रोजी मुख्य यात्रा आयोजित करण्यात आली आहे. मंगळवार यात्रेनिमित्त छबीना व प्रेक्षणीय शोभेचे दारुकाम होणार असून नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी सर्व पोलीस यंत्रणा बंदोबस्तासाठी सज्ज केली आहे. यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांसाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आरोग्य सुविधा, यात्रेकरूंसाठी निवारा, दुकानासाठी जागा उपलब्ध करण्यात आली आहे. मंगळवार दि.०७/०४/२०२६ रोजी यात्रेनिमित्त सकाळी ११ वाजता पैठण येथुन कहार व भोई समाजाने आणलेल्या पालखीची पुजा ट्रस्टी व गावकरी यांच्या वतीने करण्यात येईल यात्रेनिमित्त परिसरातील तालुक्यातील डेपो तून जादा बस गाड्यांची व्यवस्था करण्यात आली असल्याचे देवस्थानचे अध्यक्ष कडू पाटील गोरे यांनी सांगितले श्री लक्ष्मी देवीच्या यात्रेनिमित्त भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री लक्ष्मी देवी ट्रस्टचे अध्यक्ष कडू पाटील गोरे,उपाध्यक्ष लक्षाधिश दाणे,सचिव राजु शिरसाठ,सह सचिव रंगनाथ पवार,खजिनदार रावसाहेब कुंढारे,विश्वस्त रामदास गोरे,सुरेश हारदे, नवनाथ वाघ, रामचंद्र कुंढारे,किशोर शिरसाठ,सुरेश शिरसाठ,भगवान जगधने,देविदास शिरसाठ,बाळासाहेब आश्रु शिरसाठ यांनी केले आहे.

# कच्चे रस्ते पक्के व्हावे : आमदार काशिनाथ दाते सर

## नारायणगव्हाण कांडेकर दरा रस्ता कामास सुरुवात




> "गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या रस्त्याच्या कामाला अखेर गती मिळाली असून ग्रामस्थांसाठी हा अत्यंत दिलासादायक निर्णय आहे. आमदार काशिनाथ दाते सरांच्या प्रयत्नांमुळे हे काम मार्गी लागले असून यामुळे गावाच्या विकासाला निश्चितच चालना मिळेल."
> **- सुरेश बोऱ्हुडे सर,**
> **मा. सरपंच नारायणगव्हाण**

**पारनेर : (स. गांवकरी)**


गेल्या विधान सभा निवडणूकीतील विजय संपादन केल्यापासून तालुक्यातील वाड्या-वस्त्यांवरील कच्च्या रस्त्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी आपण सातत्याने पुढाकार घेत असून नुकतेच पुन्हा एकदा नव्याने नारायणगव्हाण येथील कांडेकर दरा रस्ता सुधारणा कामाचे भूमिपूजन करताना आ. दाते बोलत होते. शासनाच्या २५१५ योजना अंतर्गत १५ लाख रुपयांच्या निधीतून या कामास मंजुरी देण्यात आली आहे. यावेळी बोलताना आ. दाते म्हणाले, ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार रस्ते सुविधा मिळणे अत्यावश्यक आहे. वाड्या-वस्त्यांवरील कच्चे रस्ते पक्के करण्यासाठी आपण कटिबद्ध असून या कामांमुळे नागरिकांच्या दळणवळणाच्या अडचणी दूर होऊन विकासाला गती मिळणार आहे.

या कार्यक्रमास माजी सभापती गणेश शेळके, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, लाडकी बहिण योजना तालुकाध्यक्ष सुनील थोरात, उद्योजक सुखदेव पवार, भाजप सरचिटणीस सागर मैड, राष्ट्रवादी महिला अध्यक्षा सुषमा रावडे, मा. सरपंच सुरेश बो-हुडे सर, भाजप नेते काशिनाथ नवले, युवासेना तालुका अध्यक्ष तारा दरेकर, बाळासाहेब चव्हाण, बाळासाहेब नवले, हेमंत कांडेकर, पत्रकार दिपक करंजुले, सहादु शेळके, पोपटराव नाईक, मेजर काशिनाथ नवले, मेजर विठ्ठल कांडेकर, मेजर सतीश गाडेकर, हुसेन शेख, धनंजय नाईक, सचिन कांडेकर, शंकरराव कांडेकर, संदीप कांडेकर, सुर्यभान कांडेकर, पांडुरंग शेळके, गणेश नवले, विष्णू दरेकर, भानुदास वेताळ, अविनाश टुडे, फक्कडराव शेळके, नारायण कांडेकर, लताबाई कांडेकर, मनीषा कांडेकर, शीतल कांडेकर, संदीप कांडेकर, चंदर कांडेकर, भरत भोसले, दादासाहेब शेळके, सुदाम नवले, साहेबराव शेळके, मेजर सतीश चिपाडे, सुभाषशेठ चिपाडे, किसन चिपाडे, राहुल कांडेकर आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षांपासून हा रस्ता कच्चा असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. विशेषतः पावसाळ्यात चिखल व घसरड्या परिस्थितीमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. आता या रस्त्याच्या कामामुळे वाहतुकीस मोठा दिलासा मिळणार असून परिसराच्या सर्वांगीण विकासाला बळ मिळणार आहे.

# आयुर्वेदाचार्य डॉ. बाळानंद सरस्वती यांना 'राष्ट्रसंत' पद प्रदान!

**राजूर : (स. गांवकरी)**



अकोले तालुक्यातील ग्रामीण भागातील मवेशी येथे आयोजित करण्यात आलेल्या विशाल राष्ट्रीय संत संमेलनात देशभरातील विविध साधू-संतांच्या उपस्थितीत श्री श्री १००८ महामंडलेश्वर आयुर्वेदाचार्य डॉ. बाळानंद सरस्वती (कोंडार महाराज) यांना 'राष्ट्रसंत' ही उपाधी प्रदान करण्यात आली. सह्याद्रीच्या डोंगररांगात वसलेल्या मवेशी या खेड्यातील सर्वसामान्य आदिवासी शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या बाळू महाराज कोंडार यांना बालपणीच आजोबा शंकर दगडू कोंडार यांच्याकडून आयुर्वेदाचे बाळकडू मिळाले. पुढे पांढुर्ली येथील आयुर्वेदाचार्य लक्ष्मण स्वामी महाराज यांना गुरु मानत त्यांनी आयुर्वेदाचा सखोल अभ्यास सुरू केला. सह्याद्री पर्वतरांगांतील विविध औषधी वनस्पतींचा अभ्यास करून त्यांनी पारंपरिक उपचारपद्धती विकसित केली. सन २०१३ मध्ये नाशिक येथील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून आरोग्यमित्र पदवी शिक्षण पूर्ण करताना त्यांनी विद्यापीठात द्वितीय क्रमांक मिळवला. त्यानंतर आयुर्वेदाचार्य बाळू महाराज कोंडार म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. विविध आजारांवर औषधी वनस्पतींच्या सहाय्याने कमी खर्चात उपचार करून त्यांनी दीनदुबळ्यांची मोफत सेवा केली. २०१८ मध्ये अकोले तालुक्यातील कोतुळ जवळील बोरी येथे त्यांनी गोशाळा सुरू केली असून सध्या येथे ९२ देशी गायींचे संगोपन केले जात आहे. कोरोनाकाळात त्यांनी आयुर्वेदिक औषध तयार करून अनेकांना दिलासा दिला. त्यांच्या या कार्याची दखल घेत २०२३ मध्ये उज्जैन येथील श्री महाकाल आखाड्याने त्यांना श्री श्री १००८ महामंडलेश्वर पदवी प्रदान केली. २०२४ मध्ये मेक्सिको येथील युनिव्हर्सिटी ऑफ तोलोसा मार्फत डॉक्टरेट पदवी देण्यात आली. तसेच काशी विद्वत परिषदेकडून जीवनगौरव पुरस्कार, वनविभागाचा हरितसेना पुरस्कार, अखिल भारतीय हिंदू महासभेकडून हिंदू धर्म रक्षक योद्धा पुरस्कार आदी सन्मानांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. या सर्व कार्याची दखल घेत मवेशी येथील श्री क्षेत्र धन्वंतरी मंदिरात विशाल राष्ट्रीय संत संमेलन आयोजित करण्यात आले होते. काशी येथील गागाभट्ट यांचे १४ वे वंशज श्री श्री धर्मगुरू द्वारकाप्रसाद भट्ट यांच्या वेदमंत्रोच्चारात, कुंभमेळा समितीचे अध्यक्ष प.पू. महंत श्री राम नारायणदासजी, आचार्य महामंडलेश्वर स्वामी माधवानंद सरस्वती, त्र्यंबकेश्वरचे महंत योगी चैतन्यनाथजी, उत्तर प्रदेशचे धर्मगुरू स्वामी हरेकृष्ण महाराज शुक्रताल, राष्ट्रीय धर्मगुरू सीतामाई भिलवडी, अयोध्येचे महंत रामकृष्णदास, नर्मदा परिक्रमा स्वामी शिवगिरी महाराज, आळंदीचे महंत रघुनाथजी महाराज, काशी विद्वत परिषद वाराणसीचे आचार्य रामानारायणजी द्विवेदी, प्रयागराजचे स्वामी रामानंदतीर्थजी, देहू येथील संत तुकाराम महाराज संस्थानचे माजी अध्यक्ष ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज मोरे, विश्वगुरू सन्मानित ह.भ.प. नामदेव महाराज हरड आदी मान्यवरांच्या हस्ते कोंडार महाराजांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व शाल-श्रीफळ देऊन त्यांना 'राष्ट्रसंत' पद प्रदान करण्यात आले. कार्यक्रमास परिसरातील हजारो भाविक व सेवेकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव महाराज हरड यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्वाचे



### गॅस सिलेंडर काळाबाजार व सर्व सामान्य जनतेची लुटमार बंद करा

जामखेड तालुका (स. गांवकरी) : आज दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी वंचित बहुजन आघाडी, जामखेड तालुका यांच्या वतीने "नरेंद्र, कब मिलेगा सिलेंडर?" गॅस सिलेंडरची कृत्रिम टंचाई काळाबाजार सर्वसामान्य जनतेची होणारी आर्थिक लुटमार या मुद्द्यावर वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते ॲड डॉ अरुण आबा जाधव व संगीता ताई भालेराव नगरसेविका यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालयासमोर चुल पेटवून आंदोलन करण्यात आले यावेळी अरुण आबा जाधव म्हणाले की सध्या देशभरात गॅस सिलिंडरची भीषण व कृत्रिम टंचाई निर्माण करण्यात आलेली आहे. ही टंचाई नैसर्गिक नसून नियोजनबद्ध पद्धतीने तयार करण्यात आली असल्याचा ठोस संशय जनतेमध्ये निर्माण झाला आहे. याचाच फायदा घेत काळाबाजार करणारे दलाल व काही संबंधित यंत्रणा सर्वसामान्य नागरिकांची उघडपणे आर्थिक लूट करत आहेत. ९१६ रुपयांना उपलब्ध असणारा गॅस सिलिंडर जाणीवपूर्वक बाजारातून गायब करण्यात आला असून, तोच सिलिंडर ४,००० ते ५,००० रुपयांपर्यंत काळ्या बाजारात विकला जात आहे. ही परिस्थिती अत्यंत संतापजनक असून, यामागे कोणाचे संरक्षण आहे, असा थेट प्रश्न जनतेच्या मनात निर्माण झाला आहे. महिला, गृहिणी, गरीब, श्रमिक व मध्यमवर्गीय कुटुंबांना स्वयंपाकासाठी गॅस मिळत नसल्याने त्यांच्या घरातील चुली अक्षरशः विझल्या आहेत. अनेक ठिकाणी नागरिकांना तासन्तास लांबच लांब रांगेत उभे राहूनही गॅस मिळत नाही. ही परिस्थिती अत्यंत अमानुष व असह्य बनली आहे.



### बोरी गावात हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात

इंदापूर (स. गांवकरी) : इंदापूर तालुक्यातील बोरी गावामध्ये हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दि. 2 एप्रिल 2026 रोजी बोरी गावामध्ये जय बजरंग प्रतिष्ठान च्या वतीने सकाळी विधीवत पूजा पाठ करून संध्याकाळी ७ वाजता पूजा आरती करून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते व गावातील ग्रामस्त यांनी जय बजरंग प्रतिष्ठान च्या कार्यक्रमाला उपस्थित दर्शवली. याप्रसंगी इंदापूर पंचायत समितीचे सदस्य श्रीराज दत्तात्रय भरणे यांनी उपस्थिती दर्शवली. यावेळी गावातील सर्व तरुण मुले व वयस्कर लोक जय बजरंग प्रतिष्ठान च्या कार्यकर्ते उपस्थित होते. यावर्षीची शोभायात्रा मिरवणूक स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या निधनामुळे रद्द करण्यात आली.

### येडगाव , माणिकडोह , पिंपळगाव जोगे धरण परिसरात पाण्यासाठी वणवण

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील येडगाव , माणिकडोह , पिंपळगाव जोगे धरण व इतर डोंगर , खडकाळ परिसरात महिला भगिनींनी यांची पिण्याच्या पाण्यासाठी वणवण एप्रिल च्या पहिल्या आठवड्यात सुरू झाली आहे . तालुक्यातील सर्व धरणातील पाणीसाठा कमी होत आहे . सर्व धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साचलेला आहे . एप्रिल व मे महिन्यात धरणातील साचलेला गाळ काढल्यामुळे पाणीसाठा मध्ये वाढ होईल. यामुळे शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न व जनावरांच्या पाण्याचा प्रश्न सुटेल . याबाबत आदिवासी दुर्गम भागातील शेतकरी बांधव तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांच्या कडे मागणीकरणार आहे. अशी चर्चा सुरू आहे. माणिकडोह धरणातुन नदी द्वारे शेतीसाठी १२०० क्युमेक्स पाणी सोडण्यात आले आहे. धरणातील कालवा मधून शेतीसाठी पाणी क्युमेक्स पुढील प्रमाणे -- येडगाव १४५० , पिंपळगाव जोगे २२५ , डिंभे डावा ६२५ व उजवा २२० , व विसापुर ९० या नियोजनाने सोडण्यात आले आहे. कुकडी पाटबंधारे विभागातील धरणातील टक्केवारी पुढीलप्रमाणे : -- येडगाव २९.५० , माणिकडोह १५.७०, वडज ५५.१६ , पिंपळगाव जोगे ३६.८७ , डिंभे ३८.५५ , विसापुर ३७.७१ , चिल्हेवाडी ७७.९१ व घोड २६.८१ अशी आहे. कुकडी पाटबंधारे विभागातील आजचा उपयुक्त पाणीसाठा टक्केवारी ३०.५६ व मागील वर्षाची उपयुक्त पाणीसाठा टक्केवारी १८.७३ याप्रमाणे आहे.

### आजपासून अखंड हरिनाम सप्ताह; ७ दिवस विविध धार्मिक कार्यक्रम

- ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन
- सातदिवस होणार विविध धार्मिक कार्यक्रम

गणोरे (स. गांवकरी) : अकोले तालुक्यातील आढळा परिसरातील श्री क्षेत्र गणोरे येथे आज मंगळवार दि.७ एप्रिल पासून ते मंगळवार दि.१४ एप्रिल पर्यंत अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताह काळात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आज मंगळवार दिनांक ७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी साडेसात वाजता ह.भ. प. मदन महाराज वर्पे व ह. भ. प. पांडुरंग महाराज फरगडे व योगी केशव बाबा चौधरी यांच्या शुभहस्ते सकाळी घटस्थापना होऊन कलश पुजन, वीणापुजन व ध्वजपुजन करण्यात येऊन सप्ताहाचा शुभारंभ करण्यात येणार आहे. सप्ताह काळात मंगळवार दि.७ एप्रिल रात्री ९ वा. ह.भ.प.मदन महाराज वर्पे यांचे किर्तन व बुधवार दि. ८ एप्रिल रात्री ९ वा ह.भ.प. शांतिनिकेतन महाराज आहेर यांचे किर्तन, गुरूवार दि. ९ रोजी एप्रिल रात्री ९ वा. ह.भ.प.अर्चनाताई आहेर गणोरेकर यांचे किर्तन, शुक्रवार दि. १० एप्रिल रोजी रात्री ९.०० ह.भ.प. बाळकृष्ण महाराज डावरे यांचे किर्तन, शनिवारी दि.११ एप्रिल रात्री ९.०० वा.ह.भ.प. व्यंकटेश महाराज सोनवणे यांचे किर्तन, रविवार दि.१२ एप्रिल रात्री ९ वा. ह.भ.प विवेक महाराज केदार यांचे किर्तन, सोमवार दि. १३ एप्रिल सकाळी ९ वा. समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदूरकर यांचे हरिकीर्तन , रात्री नऊ वाजता ह भ प सागर महाराज टिपरे यांचे किर्तन, मंगळवार दि.१४ एप्रिल रोजी सकाळी दिंडी प्रदाक्षिणा मिरवणुक होउन ह.भ.प.नितिन महाराज गोडसे यांच्या काल्याचे किर्तनाने व महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होणार आहे. गणोरे पंचक्रोशीतील भाविकांनी सप्ताहात सहभागी होउन धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन गणोरे ग्रामस्थ व सप्ताह कमिटीचे वतीने करण्यात आले आहे.

# सुभाष गायकर 'आदर्श सरपंच' सन्मानाचे मानकरी!

## सुभाष गायकर यांचा राज्यस्तरीय सन्मान; ब्राम्हणवाड्याचा मान उंचावला!



### कामाची पोचपावती - सुभाष गायकर

सुभाष गायकर यांनी उपसरपंच म्हणून ब्राम्हणवाडा गावात राबवलेले विविध विकास प्रकल्प, प्रशासकीय पारदर्शकता आणि जनसामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी घेतलेले परिश्रम यामुळे त्यांची निवड सार्थ ठरली असल्याचे आयोजकांनी नमूद केले.

ब्राम्हणवाडा : (स. गांवकरी)

स्वराज्य सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठित 'राज्यस्तरीय आदर्श सरपंच सन्मान २०२६' अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा ग्रामपंचायतीचे उपसरपंच सुभाष गायकर यांना जाहीर झाला आहे. ग्रामीण विकासातील उल्लेखनीय कामगिरी आणि समाजहितासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. रविवार, ५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता सावेडी रोडवरील माऊली संकुल सभागृह, अहिल्यानगर येथे हा भव्य राज्यस्तरीय सन्मान सोहळा संपन्न झाला. 'मान कर्तृत्वाचा... सन्मान नेतृत्वाचा' या ब्रीदवाक्याखाली आयोजित या कार्यक्रमात राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

हा पुरस्कार सोहळा सरपंच सेवा संघाचे मार्गदर्शक बाबासाहेब पावसे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला श्रीमहंत डॉ. श्रीकांतदास धुमाळ (महाकालभक्त), हवामान अभ्यासक पंजाबराव डख, स्वराज्य सरपंच सेवा संघ संस्थापक यादवराव पावसे पाटील, अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक (LCB) किरण कबाडी यांसारख्या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी ब्राम्हणवाडा ग्रामस्थ व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सुभाष गायकर म्हणाले की, हा पुरस्कार केवळ माझा सन्मान नसून ब्राम्हणवाडा ग्रामपंचायतीच्या प्रत्येक सदस्याचा आणि ग्रामस्थांच्या विश्वासाचा विजय आहे. 'स्वराज्य सरपंच सेवा संघा'ने माझ्या कार्याची दखल घेतली याचा अभिमान आहे. आदर्श गाव घडवण्याचे आमचे ध्येय असून, यापुढेही लोकसहभागातून गावाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आणि समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना पोहोचवण्यासाठी मी कटीबद्ध राहीन.

## आळे येथे SIR-२०२५ मार्गदर्शन शिबिरास प्रचंड प्रतिसाद

आळे (जुन्नर) : (स. गांवकरी)

भारतीय निवडणूक आयोगाच्या विशेष मतदार यादी शुद्धीकरण मोहीमेअंतर्गत, उम्मत की खिदमत फाउंडेशन आणि मुस्लिम जमात,आळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मार्गदर्शन शिबीर अत्यंत उत्साहात संपन्न झाले. आळे येथील शाही मस्जिद हॉलमध्ये पार पडलेल्या या शिबिरात सुमारे ५८२ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या मतदार नोंदींचे मॅपिंग पूर्ण केले.

लोकशाही प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि मतदार यादीतील त्रुटी दूर करण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाने ही महत्त्वाची मोहीम हाती घेतली आहे. फाउंडेशनचे मुख्य प्रवर्तक गुलामनबी जोहरा युनूस शेख यांच्या पुढाकाराने आयोजित या शिबिरात तज्ज्ञांकडून तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी आळे



गावचे सरपंच मुकुंद भंडलकर, स्थानिक बी.एल .ओ. (BLO) डी. के. गुंजाळ, कैलास शिंदे, लक्ष्मण दराडे सर, बाळासाहेब शितोळे आणि शिंदे सर यांनी उपस्थित राहून नागरिकांना मॅपिंग आणि वारसा नोंद या प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली.

हे शिबीर यशस्वी करण्यासाठी मुस्लिम जमात, आळेचे अध्यक्ष अयाज मोमिन, तसेच मुनाज मोमिन, अनवर मणियार, इमरान मणियार, जावेद मोमिन व मुज्जू मोमिन तसेच उम्मतचे जिलानी पटेल, आदिल पटेल, आरिफ पटेल, जाकीर पठाण व सूफियान मोमिन यांनी अहोरात्र मेहनत घेतली. त्यांच्या नियोजनामुळे ५८२ नागरिकांची तपासणी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली.

## "दैनिक समर्थ गांवकरीचा इफेक्ट" : बातमी प्रकाशित करताच प्रशासन जागे

### एपीएल शेतकऱ्यांच्या खात्यात प्रलंबित अनुदान जमा सुरू

किनवट: (स. गांवकरी)

प्रतिनिधी किनवट तालुक्यातील एपीएल शेतकरी व शिधापत्रिका लाभार्थ्यांच्या प्रलंबित अनुदानाचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून, यामध्ये "दैनिक समर्थ गांवकरी इफेक्ट" स्पष्टपणे दिसून येत आहे. दैनिक समर्थ गांवकरीमध्ये या गंभीर प्रश्नावर ठळकपणे बातमी प्रसिद्ध होताच प्रशासनाने तातडीने हालचाली करत लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्यास सुरुवात केली आहे.

सुमारे वर्षभर प्रलंबित असलेल्या या अनुदानामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते तथा भाजप आदिवासी मोर्चाचे तालुका अध्यक्ष संतोष पांडुरंग कनाके यांनी सातत्याने पाठपुरावा करत तहसील प्रशासनाचे लक्ष वेधले होते. ज्येष्ठ कार्यकर्ते गोविंद सिरमनवार यांच्या सहकार्याने सादर करण्यात आलेल्या निवेदनानंतरही प्रश्न प्रलंबितच होता.




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी
www.sgavkari.com
17 Feb 2026 - Page 5
APL शेतकरी लाभार्थ्यांना राशनऐवजी रोख रक्कम मिळाली नाही; तहसीलदारांना निवेदन
किनवट : (समर्थ गांवकरी)

दरम्यान, दैनिक समर्थ गांवकरीने या विषयावर सविस्तर वृत्त प्रकाशित करून प्रशासनाचे दुर्लक्ष अधोरेखित केले. या वृत्ताची दखल घेत प्रशासनाने तात्काळ कार्यवाही सुरू केली. परिणामी, आता टप्प्याटप्प्याने हजारो लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा होत आहे. किनवट तहसील कार्यालयामार्फत एप्रिल २०२४ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत सुमारे १५८ गावांतील लाभार्थ्यांना एकूण सुमारे ४ कोटी ५ लाख २३ हजार ७७ रुपये इतका निधी वितरित करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा झाल्याने समाधान व्यक्त केले जात आहे. या संपूर्ण प्रकरणात दैनिक समर्थ गांवकरीने घेतलेली ठाम भूमिका आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा यामुळेच प्रशासनाला जाग आली, अशी भावना लाभार्थ्यांकडून व्यक्त होत आहे. तसेच, संतोष कनाके यांच्या प्रयत्नांनाही यश आल्याचे स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, उर्वरित पात्र लाभार्थ्यांनाही लवकरात लवकर अनुदान मिळावे, अशी मागणी होत असून, भविष्यात अशा योजनांची अंमलबजावणी वेळेत आणि पारदर्शकपणे व्हावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

## विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक बहिष्काराची घोषणा

डांग, गुजरात : (स. गांवकरी)

- "पूल नाही, तर मत नाही"

राज्यभर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पडघम वाजत असताना डांग जिल्ह्यातील आहवा तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या कोटमदर गावातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. ग्रामस्थांनी विकासाच्या मुद्द्यांवर तीव्र नाराजी व्यक्त करत येणाऱ्या स्थानिक स्वराज्य निवडणुकांचा बहिष्कार करण्याचा निर्णय घेतला आहे.

कोटमदर गावात अनेक वर्षांपासून मूलभूत सुविधांचा अभाव आहे. विशेषतः वाहतूक व्यवस्था अत्यंत बिकट स्थितीत आहे. जाखाना गाव ते कोटमदर यांना जोडणाऱ्या कड्यावर असलेला डुबाऊ नाला साध्या पावसातही पाण्याने भरून वाहू लागतो. त्यामुळे वाहनांची ये-जा पूर्णपणे ठप्प होते आणि पादचाऱ्यांसाठी जीव धोक्यात



घालून प्रवास करण्याची वेळ येते.

पावसाळ्यात ग्रामस्थांना शिक्षण, आरोग्य आणि दैनंदिन जीवनात मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. विद्यार्थी शाळेत जाऊ शकत नाहीत, रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाहीत आणि रोजगारासाठी बाहेर पडणारे लोकही अडकून पडतात.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, या समस्येबाबत त्यांनी तालुका, जिल्हा प्रशासन तसेच आमदारांपर्यंत अनेक वेळा निवेदने दिली आहेत. तरीही आजपर्यंत कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. सध्या ग्रामस्थांचा एकच ठाम नारा आहे – "आम्हाला पूल हवा, फक्त आश्वासने नकोत." दर निवडणुकीत आश्वासने दिली जातात, पण प्रत्यक्षात काम होत नाही, असा संताप ग्रामस्थांमध्ये दिसून येत आहे.

माजी सरपंच गंगाराम बागुळे यांनी सरकारवर गंभीर आरोप करत सांगितले की, "आम्ही अनेक वर्षे भाजप पक्षाशी जोडलेलो आहोत, तरीही आमचे काम झालेले नाही. स्वातंत्र्यानंतर इतकी वर्षे उलटूनही गावात रस्ते, पाणी आणि इतर मूलभूत सुविधा नसणे ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे."महिला नेत्या कमलाबेन माहला यांनीही ग्रामस्थांच्या समस्यांबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे.सध्या ग्रामस्थांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जोपर्यंत या डुबाऊ नाल्यावर उंच पूल बांधला जात नाही, तोपर्यंत ते मतदानात सहभागी होणार नाहीत.

एकीकडे सरकार "सर्वांचा साथ, सर्वांचा विकास" अशी घोषणा देत असताना कोटमदर गावातील हा विरोध त्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उभे करतो. आता प्रशासन आणि राजकीय नेते या मुद्द्यावर कितपत जलद आणि प्रभावी पावले उचलतात, आणि ग्रामस्थांचा बहिष्काराचा निर्णय मागे घेतला जाईल का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## सर्वांगीण प्रगतीसाठी सदैव कटीबद्ध - सुमतीलाल कोठारी



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

भारत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी नुकतेच स्पर्धा परीक्षेत चांगले यश मिळविले आहे. तसेच शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामुळे शाळेच्या लौकिकात भर पडत आहे.भारत विद्यालयाच्या वैभव प्राप्तीसाठी संस्थेमार्फत लागणाऱ्या सर्व प्रकारच्या मदतीसाठी आम्ही कटिबद्ध आहोत.असे आश्वासित करून विद्यालयाचा चेहरा मोहरा येत्याकाळात निश्चित बदलला जाईल. असे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाचे नूतन कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांनी केले. मिरजगाव येथील हिंदसेवा मंडळ संचलित भारत विद्यालयात हिंद सेवा मंडळाचे नूतन कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी,उपकार्याध्यक्ष ज्योतीताई कुलकर्णी,सहाय्यक सचिव योगेश देशमुख यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी हे होते.या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे चेअरमन डॉ.रमेश झरकर,प्रशासकीय अधिकारी संजय मुदगल,शालेय समितीचे सदस्य विकास कटारिया,गणेश झरकर,विद्यालयाचे मुख्याध्यापक किशोर खुरंगे आदींसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्रस्ताविकात चेअरमन डॉ.रमेश झरकर यांनी विद्यालयाच्या विविध विकास कामांचा आढावा घेतला. विद्यालयाच्या गुणवत्ते बाबतीत त्यांनी समाधान व्यक्त केले.

# ठाणे जिल्ह्यात 'डिजिटल जनगणने' ची तयारी सुरू

### ६४ फिल्ड ट्रेनर्सचे प्रशिक्षण सुरू

ठाणे : (स. गांवकरी)

भारतीय जनगणना २०२७ च्या प्रक्रियेला ठाणे जिल्ह्यात सुरुवात झाली असून जिल्हा प्रशासनाने यासाठी कंबर कसली आहे. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणाऱ्या या जनगणनेसाठी ठाणे जिल्ह्यात जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. पूर्वतयारीसाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयातील पाचव्या मजल्यावरील समिती सभागृहात फिल्ड ट्रेनर्सच्या प्रशिक्षणाचा शुभारंभ करण्यात आला. तहसिलदार (सर्वसाधारण) श्री. सचिन चौधर यांच्या उपस्थितीत सुरू झालेल्या या प्रशिक्षण वर्गातून जिल्ह्यातील तांत्रिक मनुष्यबळ सज्ज केले जात आहे. उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रूपाली भालके यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली हे संपूर्ण नियोजन करण्यात आले असून, प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक प्रगणकापर्यंत अचूक माहिती पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, या प्रशिक्षणासाठी ३२-३२ जणांच्या दोन स्वतंत्र बॅचेस तयार करण्यात आल्या असून एकूण ६४ फिल्ड ट्रेनर्सना प्रशिक्षित केले जात आहे. हे प्रशिक्षण ११ एप्रिल २०२६ पर्यंत चालणार असून मास्टर



ट्रेनर म्हणून कल्याणचे तहसिलदार (अकृषिक) श्री.विनोद भामरे आणि तहसिलदार (सं.गा.यो मनपा क्षेत्र) श्रीम.स्वाती घोंगडे हे तज्ज्ञ मार्गदर्शन करीत आहेत. जनगणना-२०२७ चा पहिला टप्पा असलेल्या घरयादी व घरगणनेवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. डिजिटल स्वरूपामुळे यावेळी प्रगणकांना कागदी अर्जांऐवजी सीएमएमएस (CMMS) पोर्टल आणि एचएलबीसी (HLBC) ॲपचा वापर करावा लागणार आहे. या ॲपचे तांत्रिक ज्ञान, जनगणना कायदा व नियम, आणि माहिती संकलनाची प्रक्रिया याबाबत या ६४ फिल्ड ट्रेनर्सना हँड्स-ऑन ट्रेनिंग दिले जात आहे. हे प्रशिक्षित ट्रेनर्स पुढे २७ एप्रिल ते ८ मे २०२६ या कालावधीत प्रधान जनगणना अधिकारी तथा जिल्हाधिकारी ठाणे यांच्या अधिनस्त असलेल्या नऊ चार्जमधील सुमारे ४ हजार प्रगणक आणि पर्यवेक्षकांना सज्ज करणार आहेत.जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी या प्रक्रियेत अचूकतेचे महत्त्व अधोरेखित केले असून डिजिटल सुविधेमुळे डेटा संकलनात पारदर्शकता येईल, असा विश्वास व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे, या जनगणनेत नागरिकांसाठी प्रथमच 'स्व-गणना' म्हणजेच सेल्फ-इन्युमरेशनची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी १ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत शासनाच्या अधिकृत वेबपोर्टलवर लॉगीन करून स्वतःची माहिती नोंदवावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. प्रत्यक्ष क्षेत्रीय स्तरावर १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत घरयादी आणि घरगणनेचा पहिला टप्पा राबविला जाणार आहे. उपजिल्हाधिकारी रूपाली भालके यांच्या नियोजनाखाली जिल्ह्याचा कोणताही भाग या प्रक्रियेतून सुटू नये आणि माहितीचे संकलन विहित वेळेत पूर्ण व्हावे, यासाठी जिल्हा प्रशासनाची यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यरत झाली आहे.